CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### आता दुप्पट दंडाची आकारणी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेकडून घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी), स्वच्छता आणि स्वच्छताविषयक उपविधी - २०२५ जारी करण्यात येत आहे. यामध्ये कचरा निर्माण करणारे घटक, विविध आस्थापना, कचराविषयक सेवा प्रदाता; घनकचरा व्यवस्थापन, साठवणूक, वितरण व प्रक्रिया, आदींबाबत नियमावलींचा समावेश आहे. नागरिक किंवा आस्थापनांनी यासंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या अंतर्गत, सार्वजनिक स्थळी थुंकल्यास, कचरा टाकल्यास, ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण न केल्यास तसेच, विनापरवाना राडारोडा वाहतूक केल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. याची आकारणी २ फेब्रुवारीपासून झाली आहे.

### 'तेरे नाम' प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई :** सलमान खानचा 'तेरे नाम' हा चित्रपट परत येत आहे आणि सलमान खानचे चाहते या चित्रपटाचा अनुभव घेण्यासाठी उत्सुकतेने तयार आहेत. हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा रोमँटिक चित्रपट २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या पडद्यावर परतणार आहे. २००३ मध्ये प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाला २३ वर्षे पूर्ण होत आहेत.यापूर्वी हा चित्रपट १५ ऑगस्ट २००३ रोजी प्रदर्शित झाला होता.हा चित्रपट जेव्हा पहिल्यांना चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला तेव्हा त्याच्या कथेनी आणि सलमान खानच्या भूमिकेने आणि त्यामध्ये विशेषतः सलमान खानच्या हेअरस्टाईलने प्रेक्षकवर्गाची मने जिंकली होती.

### तरुणीची आत्महत्या

**पुणे :** सोलो ट्रेकिंगसाठी आलेल्या विद्यार्थिनीचा १ फेब्रुवारी सायंकाळी ५ च्या सुमारास मृतदेह आढळून आला. लोणावळ्यातील प्रसिद्ध टायगर पॉईंट या परिसरात आढळून आलेल्या मुंबईतील तरुणीच्या मृत्यू प्रकरणाने राज्यभरात चर्चेला उधाण आले होते. ४०० फूट खोल दरीत सापडलेल्या मृतदेहाच्या घटनेचा सखोल तपास केल्यानंतर पोलिसांनी हा मृत्यू अपघाती नसून आत्महत्येचा असण्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली आहे.मृत तरुणीचे नाव श्रेया नरेंद्र पटी (वय १९) असे असून ती मुंबईतील रहिवासी होती. श्रेया ही नामांकित महाविद्यालयातून कायद्याचे शिक्षण घेत होती. श्रेयाला फिरण्याची आवड असल्याने ती लोणावळ्यात ट्रेकिंगसाठी गेली होती. सुरुवातीला ही घटना अपघात किंवा घातपात असल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र घटनास्थळाची पाहणी, पंचनामा आणि इतर प्राथमिक पुराव्यांच्या आधारे लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तपासाची दिशा बदलली.

### ट्रम्प ला धडा शिकवणार ?

**नवी दिल्ली :**डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक टॅरिफ धोरणांनी अख्ख्या जगाच्या नाकीनऊ आणले आहे. गेल्या वर्षभरापासून टॅरिफचं रडगाणं गाणाऱ्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना आता अख्खं जगच धडा शिकवायची तयारी करत आहे. रशियावर अमेरिकेच्या निर्बंधांनंतर चीन आणि भारतासारखे देश आता 'कागदी डॉलर'पेक्षा सोने खरेदीला प्राधान्य देऊन महासत्तेची कोंडी करायचा प्रयत्न करत आहेत.जगाचा अमेरिकेवरील विश्र्वास डळमळीत झाल्यामुळे जगभरातील बँका डॉलर्सचा स्टॉक काढून जोमाने सोने खरेदी करत आहेत.

### नवजात बालिकेला फेकले

**मुंबई :** खार पश्चिम येथे नवजात बालिकेला कचऱ्याच्या पिशवीत भरून इमारतीतील रिफ्युजी रूममध्ये फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. निर्भया पथकामुळे बालिकेचे प्राण थोडक्यात वाचले आहे, तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी पोलिसांनी छत्तीसगडची रहिवासी असलेल्या २० वर्षीय तरुणीवर गुन्हा दाखल केला आहे. ओम निर्माण इमारतीच्या १४ व १५ मजल्याच्या मधील रिफ्युजी रुममध्ये कचऱ्याच्या पिशवीत नवजात बालिका दिसल्यामुळे नागरिकांनी लगेच खार पोलीस ठाण्यात कळवलं. पोलिसांना ही घटना कळताच निर्भया पथक तातडीने घटनास्थळी हजर झाले. निर्भया पथकाच्या तत्परतेमुळे बालिकेचे थोडक्यात प्राण जाता जाता वाचले.वैद्यकीय उपचारासाठी तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या बालिकेवर भाभा रुग्णालय उपचार सुरु आहे.

### स्पा सेंटरवर कारवाई

**पिंपरी-चिंचवड:** पिंपरी- चिंचवड शहरात वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या स्पा सेंटर आणि लॉजवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत आठ महिलांची सुटका केली आहे. या कारवाईत विशालनगर येथील इंटरनल फॅमिली स्पा येथून चार महिलांची, तर निगडी येथील ईगल स्पा मधून दोन महिलांची सुटका करण्यात आली आहे. याशिवाय कृष्णा लॉज आणि आळंदी येथील योगीराज लॉज येथेही छापे टाकून प्रत्येकी एका महिलेची सुटका करण्यात आली आहे.

### शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी

# गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा करार महत्वपूर्ण : फडणवीस

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०३ फेब्रुवारी :** महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा हा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य सरकारच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



गोदरेज ग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील ९ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी आमचे शासन कटिबद्ध आहे. या पार्श्र्वभूमीवर गोदरेज ग्रोवेटसोबतची भागीदारी ही शाश्र्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केलेल्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५,००० हून अधिक महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी गोदरेज ग्रोवेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अंतर्गत महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्य शासन मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेशी जोडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.महिला शेतकरी वर्गाला सक्षमकरण्याच्या दिशेने हे निश्चितच एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या ९ जिल्ह्यांचा समावेश आहे. सुमारे ५० हजार एकर क्षेत्रावर ५ हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पिकांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकत्व

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०३ फेब्रुवारी :** बारामती येथे विमान दुर्घटनेत अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर उपमुख्यमंत्री पदाची धुरा त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यानंतर आता पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. याबाबतचा अधिकृत आदेश मंगळवारी काढण्यात आला.



अजित पवार यांच्या पश्चात सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्री म्हणून राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक आणि औकाफ, तसेच क्रीडा युवक कल्याण ही खाती देण्यात आली. दरम्यान, अजित पवार हे पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर या जिल्ह्यांचे पालकत्व कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होती. अपेक्षेप्रमाणे पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आले आहे. यामुळे अजित पवार यांच्याकडे असलेल्या जबाबदाऱ्या पुढे नेण्याची जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांच्यावर आहे. बीड जिल्ह्यात घडलेल्या वादग्रस्त घटनांनंतर अजित पवार यांनी स्वतःकडे या जिल्ह्याचे पालकत्व घेतले होते. त्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यातील दौरे वाढवले होते. बीडसह पुणे जिल्ह्यातील गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न सुरू केले होते. तसेच बीड जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अजित पवार यांनी ठोस पावले उचलली होती.

## कोकणात प्रदूषणकारी कंपन्यांना थारा नाही : एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**चिपळूण, दि. ०३ फेब्रुवारी :** कोकणच्या मातीवर, पाण्यावर आणि जनतेच्या श्र्वासावर घाला घालणाऱ्या प्रदूषणकारी उद्योगांविरोधात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी थेट रणशिंग फुंकलं! चिपळूण तालुक्यातील खेड येथील लोटे परशुराम एमआयडीसीत इटलीतून हद्दपार करण्यात आलेली मितेनी कंपनी अप्रत्यक्षपणे 'लक्ष्मी ऑरगॅनिक' या नावाने कार्यरत आहे. अशा प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना कोकणात थारा देणार नाही! जनतेच्या आरोग्याशी खेळ होऊ देणार नाही!असे सांगत त्यांनी अत्यंत आक्रमकपणे आणि स्पष्ट शब्दात आपली भूमिका मांडली.

विकासाच्या नावाखाली कोकणचा निसर्ग आणि लोकांचे आयुष्य धोक्यात घालणाऱ्या शक्तींविरोधात सरकार कठोरात कठोर भूमिका घेईल, असा निर्धार त्यांनी यावेळी जनतेसमोर मांडला. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर चिपळूणच्या इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी राजकीय सभेऐवजी जणू विकासाचा रणसंग्रामच उघडला. हजारोंच्या जनसमुदायासमोर त्यांनी कार्यकर्त्यांची ताकद, कोकणाशी शिवसेनेचं ऐतिहासिक नातं, महिलांपासून शेतकऱ्यांपर्यंतच्या योजना, केंद्र-राज्य सरकारची डबल इंजिन शक्ती आणि रत्नागिरी जिल्ह्यावर भगवा फडकवण्याचा निर्धार एका श्र्वासात मांडला. सभेच्या सुरुवातीलाच शिंदेंनी उपमुख्यमंत्री अजितदादांच्या अकाली निधनावर श्रद्धांजली अर्पण करत वातावरण भावनिक केलं. शिंदेंनी ठामपणे सांगितलं की पक्षाचा खरा कणा हा कार्यकर्ता आहे. या पक्षात कोणी मालक नाही, कुणी नोकर नाही, आपण सगळे कार्यकर्ते आहोत आणि संपूर्ण पक्षाचा डोलारा हा कार्यकर्त्यांच्या जीवावर उभा आहे, असा थेट संदेश त्यांनी शिवसेना, भाजप आणि आरपीआयच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला.

## पुण्याच्या महापौरपदीमंजुषा नागपुरे यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०३ फेब्रुवारी :** पुणे महापालिकेच्या (झचउ) नव्या महापौर म्हणून भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविकामंजुषा नागपुरे यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यंदा पुण्याचे महापौरपद भूषवण्याचा मान पहिल्यांदाच सिंहगड रोड परिसराला मिळाला आहे. प्रभाग क्रमांक ३५ (सनसिटी माणिक बाग) येथून सलग तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करणाऱ्या नागपुरे या यंदाच्या निवडणुकीतही बिनविरोध निवडून आल्या होत्या. पुणे महापालिकेची ही निवडणूक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात झालेल्या महत्त्वपूर्ण चर्चेनंतर, महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक बिनविरोध करण्याचे ठरले होते. या निर्णयाचा मान राखत राष्ट्रवादी काँग्रेसने आपला उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे मंजूषा नागपुरे यांचा मार्ग सुकर झाला. मंजूषा नागपुरे यांचा प्रदीर्घ अनुभव आणि सलग तीन वेळा मिळालेला विजय लक्षात घेता पक्षाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे.

## मुंबई-पुणे प्रवास आता फक्त ४८ मिनिटांत - रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी वाढवण बंदरासाठी थेट जलद रेल्वे जोडणीची घोषणा केली. त्यानंतर रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी सोमवारी २ फेब्रुवारी रेल्वे प्रकल्पांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुदींची माहिती दिली. यावेळी त्यांनी राज्यात १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे प्रकल्पांचे काम सुरू असल्याचे सांगून आता लवकरच मुंबई-पुणे प्रवास फक्त ४८ मिनिटांमध्ये करता येईल असे सांगितले.



राज्यात १ लाख ७० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे काम सुरू आहे. यात दुहेरीकरण, चौपदरीकरण अशा मार्गांचा समावेश आहे. राज्यातील दुसरी बुलेट ट्रेन मुंबई-पुणे-हैदराबाद मार्गावर धावणार आहे. याचबरोबर वाढवण बंदराला नव्या समर्पित मालवाहतुकीची जोडणी देण्यात येणार आहे. यामुळे प्रवासी आणि मालवाहतुकीला गती मिळणार आहे, असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले.रेल्वेमंत्र्यांनी पुढे सांगितले की; कोकण रेल्वेच्या दुहेरीकरणात कवच प्रणाली कार्यान्वित करण्याची प्रक्रिया रेल्वे मंत्रालयाने सुरू केली आहे. तसेच मुंबई उपनगरी रेल्वेवरील गाड्यांची प्रवासी क्षमता वाढवण्यासाठी १५ डब्यांच्या अधिक लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर लोकलची प्रवासी संख्या लक्षात घेता मेट्रोहून अधिक उन्नत आराखड्यात २३८ वातानुकूलित लोकलची बांधणी करण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पात चार हजार किलोमीटर लांबीचा बुलेट ट्रेन विस्ताराचा दुसरा टप्पा जाहीर करण्यात आला. मुंबई-पुणे-हैदराबादसह सात मार्गांचा यात समावेश करण्यात आला आहे. मुंबई-हैदराबाद मार्गावरून राज्यातील दुसरी बुलेट ट्रेन धावणार आहे. यामुळे मुंबई-पुणे अंतर केवळ ४८ मिनिटांत तर पुणे-हैदराबाद हे अंतर एक तास ५५ मिनिटांत पूर्ण करणे शक्य होणार आहे. याचा थेट फायदा मुंबई-पुणेदरम्यान ये-जा करणाऱ्या प्रवाशांना होईल. बुलेट ट्रेनमुळे दोन्ही महत्त्वाच्या शहरांमधील प्रवास अंतर कमी होईल. त्याचबरोबर बुलेट मार्गालगत कंपन्या, शहरीकरण आणि आयटी हब उभारणीमुळे रोजगारातही वाढ होणार असल्याचे रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव

## अजित पवारांचा अपघात झालेल्या 'व्हीएसआर व्हेंचर' विमान कंपनीचे ऑडिट करा; 'डीजीसीए'चे आदेश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०३ फेब्रुवारी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर या घटनेच्या तपासाला गती देण्यात आली असून, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने संबंधित विमान कंपनीविरोधात कठोर पावले उचलली आहेत. अजित पवार ज्या कंपनीच्या विमानाने प्रवास करत होते, त्या 'व्हीएसआर व्हेंचर' कंपनीचे सखोल ऑडिट करण्याचे आदेश डीजीसीएने दिले असून, त्याचा अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.अपघातग्रस्त 'लिअरजेट ४५ एक्सआर' (मालक - व्हीएसआर व्हेंचर) विमानाच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डीजीसीएने विशेष पथक नेमले आहे.

या ऑडिटअंतर्गत कंपनीचे रोजचे कामकाज, वैमानिकांचे लॉगबुक, तसेच विमानांच्या देखभाल आणि तांत्रिक तपासणीशी संबंधित कागदपत्रांची कसून छाननी केली जाणार आहे. विमानांची नियमित तपासणी होत होती का आणि नोंदी अचूक व पारदर्शक पद्धतीने ठेवण्यात आल्या होत्या का, याची विशेष तपासणी केली जाणार आहे.अजित पवार हे २८ जानेवारी रोजी जिल्हा परिषद निवडणूक प्रचारासाठी विमानाने मुंबईहून बारामतीकडे निघाले होते. बारामती विमानतळावर लँडिंगचा पहिला प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर दुसऱ्यांदा लँडिंग करत असताना विमानाचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह अन्य चार जणांचा जागीच मृत्यू झाला.या घटनेनंतर अपघातामागील कारणांचा सखोल तपास करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.या अपघाताच्या तांत्रिक आणि वातावरणीय कारणांचा शोध 'एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो' घेत असून, त्याच वेळी डीजीसीएने कंपनीच्या एकूण कार्यपद्धतीवर लक्ष केंद्रित करत विशेष ऑडिट सुरू केले आहे.

चौकशीदरम्यान 'व्हीएसआर व्हेंचर' कंपनीचा वादग्रस्त इतिहासही समोर आला

# समाज संघाकडे विश्वासाने बघतो

## सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचे प्रतिपादन

### समर्थ भारतच्या अद्ययावत वेबसाईटचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०३ फेब्रुवारी :** समाज संघाकडे सकारात्मकतेने, विश्र्वासाने बघतो. ही आपल्यासाठी संधी आणि आव्हान दोन्ही आहे. समर्थ भारतसारखी नियोजनबद्ध कामे पूर्व योजनेने हाती घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केले.

मोतीबाग येथे पू. सरसंघचालकांच्या हस्ते समर्थ भारतच्या अद्ययावत वेबसाईटचे उद्घाटन झाले त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यावेळी उपस्थित होते.

सरसंघचालक भागवत पुढे म्हणाले की,संघात काम करताना नागरिकांना सुरक्षितता वाटते असा अनुभव आहे.काळाची शर्यत लक्षात घेता समाजाची कामे गतीने झाली पाहिजेत.त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेत स्थानिक पातळीवरील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी ही वेबसाईट नक्कीच उपयोगी आहे.

समर्थ भारत हा एक सामाजिक उपक्रम असून, सामाजिक कामांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागातून भारताला सक्षम बनवण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. आरोग्यसेवा, शिक्षण, सक्षमीकरण, शाश्र्वतता आणि समुदाय विकास ( sustainability , community development) अशा विविध सामाजिक उपक्रमांशी सामान्य नागरिक, स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट्स यांना जोडणे हे समर्थ भारतचे प्रमुख कार्य आहे.

२०१७ मध्ये सुरू झालेला समर्थ भारत हा एक मोफत प्लॅटफॉर्म असून, नागरिक, स्वयंसेवी संस्था (NGOs) आणि कॉर्पोरेट्स यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी तयार करण्यात आला आहे. नागरिकांना अर्थपूर्ण सामाजिक उपक्रमांशी जोडून, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवकांचे नेटवर्क आणि CSR साठी कटिबद्ध कंपन्या यांना एकत्र आणण्याचे कार्य समर्थ भारत करते.



आजपर्यंत समर्थ भारतने ७ हजार ५०० हून अधिक स्वयंसेवकांना विविध स्वयंसेवी संस्थांशी जोडले आहे. २०१८ मधील स्वच्छ नदी अभियान, कोविड-१९ मदतकार्य, ३ लाखांहून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन, ५१ लाखांपेक्षा जास्त भोजन वितरण आणि एक लाखांहून अधिक वैद्यकीय तपासण्या अशा अनेक प्रभावी सामाजिक उपक्रमांना चालना दिली आहे. सेवा भारती, PSVP, ग्राम विकास, पूर्णम इकोव्हिजन, स्वरूप वर्धिनी, जनकल्याण ब्लड सेंटर, सेवा आरोग्य, स्वानंद जनकल्याण, एक क्षण आनंदाचा तसेच इतर अनेक संस्थांना पाठबळ दिले आहे.

सहकार्याच्या माध्यमातून समुदायांना सक्षम बनवणे, विविध कॉर्पोरेट्सना कोणत्याही खर्चाशिवाय स्वयंसेवी संस्थांशी जोडून यामुळे CSR गुंतवणूक थेट समाजाच्या गरजांपर्यंत पोहोचविण्यासाठी समर्थ भारत काम करते. यावेळी समर्थ भारतचे मंगेश घाटपांडे, विनोद खरे, अधिराज गाडगीळ उपस्थित होते.

## देशात पुन्हा परतणार पाऊस

### ९ राज्यात वादळी वाऱ्यासह दमदार पावसाची हजेरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील बहुतांश राज्यात फेब्रुवारीत एरवी पाऊस पडत नाही. पण बदलत्या हवामानाचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे, भारतातील ऋतुचक्रही पूर्णपणे कोलमडले आहे. आता भारतीय हवामान विभागाने देशातील काही राज्यांसाठी पुन्हा एकदा पावसाचा इशारा जारी केला आहे.हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, उत्तर भारतासह मध्य आणि पश्र्चिम भारतातील एकूण नऊ राज्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि लडाख या भागांमध्ये पुढील काही दिवस हवामान बिघडण्याचा अंदाज आहे. विशेषतः हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये ३ फेब्रुवारीपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी वाऱ्यांचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. डोंगराळ भागांमध्ये याचा परिणाम अधिक जाणवण्याची शक्यता आहे.दरम्यान, अरबी समुद्र आणि लगतच्या किनारपट्टी भागांमध्येही हवामानात बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे मच्छीमारांनी पुढील काही दिवस समुद्रात जाणे टाळावे, अशा सूचना संबंधित यंत्रणांकडून देण्यात आल्या आहेत. हवामानातील या बदलांमुळे शेती, वाहतूक आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता असून, नागरिकांनी अधिकृत हवामान अंदाजांवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# मातोश्री पापड उद्योगाला महाराष्ट्र बिजनेस आयकॉन पुरस्कार

## अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते उद्योजक धीरजकुमार भनगीरे यांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** लातूरच्या मातोश्री पापड उद्योगाला नाशिक येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते ''महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लातूरचे भूमिपुत्र धीरजकुमार भनगीरे आणि त्यांच्या मातोश्री सौ आयोध्या पांडुरंग भनगीरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

एका सामान्य कुटुंबातून येत, स्वतःची जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर आज उद्योग क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करून एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून धीरजकुमार भनगीरे समोर आले आहेत. मुंबई विद्यापीठातून मार्केटिंगमध्ये पूर्ण केल्यानंतर त्यांनी लॉजिस्टिक क्षेत्रात काही काळ नोकरी केली. मात्र, स्वतःचे काहीतरी वेगळे करण्याची ओढ त्यांना उद्योजकतेकडे घेऊन आली.

गुजरात, राजस्थान अशा राज्यांतून आपल्या भागामध्ये पापडांची भरपूर प्रमाणात आयात असल्याचे त्यांच्या लक्षात आले अशा प्रकारचा उद्योग आपल्या भागात कमी पडत असल्याचे त्यांना जाणवले म्हणून आईच्या घरगुती पापड बनवण्याच्या व्यवसायाला त्यांनी व्यावसायिक रूप देण्याचे ठरवले. आणि २०१८ मध्ये ''मातोश्री फूड्स अँड स्पायसेस'' ची मुहूर्तमेढ रोवली. आज हा ब्रँड आधुनिक तंत्रज्ञान आणि अस्सल पारंपरिक चवीचे एक समीकरण बनला आहे.

आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादनाचा विस्तार करत भेसळ न करता एकदम ओरिजनल कॉलिटी चे उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवत त्यांनी स्वतःचा वेगळा ग्राहक वर्ग निर्माण केला आहे.

आज मातोश्री पापड मोठ्या स्तरावर विस्तारले असून, अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने उत्पादनाची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. यंत्रांच्या साहाय्याने उत्पादन करताना पदार्थांची घरची अस्सल चव जपण्याला धीरजकुमार यांनी प्रथम प्राधान्य दिले आहे. ग्राहकांच्या आवडीचे उडीद पापड, नाचणी पापड, तांदूळ पापड, पोहे पापड, उपवासाचे पापड, शेवई, कुरडई आणि बाजरीची खारुडी असे विविध पारंपरिक आणि वाळवणाच्या पदार्थांना त्यांनी एकाच छत्राखाली ग्राहकांना उपलब्ध करून दिले असल्याने लातूर जिल्ह्यातच नव्हे तर पूर्ण देशभर त्यांच्या उत्पादनांना प्रचंड प्रतिसाद आहे.एका छोट्या घरगुती व्यवसायाला मोठ्या उंचीवर नेऊन महिला सबलीकरण आणि रोजगार निर्मितीला त्यांनी हातभार लावला आहे.

धीरजकुमार भनगीरे यांच्या यशाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेऊन रिसील.इन यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात, मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते त्यांना दि. २७ जानेवारी २०२६ रोजी नाशिक येथे ''महाराष्ट्र बिझनेस आयकॉन अवॉर्ड २०२५'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच लातूर कृषी विभागाने या उद्योगास प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजने मार्फत चालना दिली गेली असल्याने हा पापड उद्योग लातूर जिल्ह्यातील सर्व प्रकारचे पापड उत्पादित




करणारे पहिले आणि सर्वात मोठे युनिट आहे. या पुरस्काराचे श्रेय धीरजकुमार यांनी त्यांच्या आईला आणि कुटुंबाला दिले आहे. त्यांचा हा प्रवास अनेक तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरत असून त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त...

### थेरगाव येथे संत रविदास महाराज यांची ६४९वी जयंती साजरी



**शिरूर आनंतपाळ :** तालुक्यातील थेरगाव येथे चर्मकार समाजाच्या वतीने दि. १ फेब्रुवारी रोजी संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रविदास जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेला चर्मकार समाजाच्या वतीने श्रद्धेने व भक्ती भावाने साजरी केली जाते. त्यांच्या कृतीने विचार आणि भक्तीने संत रविदास यांनी समाजातील असमानता आणि भेदभावच्या प्रचलित कल्पनांना आव्हान दिले होते. गुरु रविदास हे भक्ती चळवळीतील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्व होते हिंदू कॅलेंडरनुसार रविदास जयंती माघ पौर्णिमेला केली जाते. म्हणुन याच पौर्णिमे दिवशी थेरगाव येथील चर्मकार समाजाच्या वतीने

संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन शिवदास सुर्यवंशी यांच्या हस्ते करून विन्रम अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी समाजाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी उपस्थित नामांकित पेंटर रविदास सुर्यवंशी, गोवर्धन सुर्यवंशी, हरीदास सुर्यवंशी, बालाजी हौसे, धनाजी सुर्यवंशी, शिवदास सुर्यवंशी, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

### जवळगा मतदारसंघात रामलिंग शेरे यांचा झंझावात

**वलांडी/रियाज मोमीन**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रचार यंत्रणा आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जवळगा जिल्हा परिषद गटात भाजपाचे उमेदवार रामलिंग शेरे यांचा प्रचार अक्षरशः मतदारांच्या चुलीपर्यंत पोहोचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. घराघरात जाऊन, भाकरी करणाऱ्या महिलांशी थेट संवाद साधत शेरे मतदारांना मतदानाचे आवाहन करत आहेत.जवळगा जिल्हा परिषद गटात प्रचाराला वेग आला असून भाजपाने सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देत वेगळा संदेश दिला आहे. संभाजीरावांचे निष्ठावंत कार्यकर्ते व अक्का फाऊंडेशनचे समन्वयक असलेले रामलिंग शेरे यांना उमेदवारी देत भाजपाने तळागाळातील कार्यकर्त्यांना न्याय दिल्याची चर्चा आहे.सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी मिळाल्याने तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने प्रचारात सहभागी झाला आहे. व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम व स्नॅपचॅट या सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ व ऑडिओ क्लिप्स व्हायरल केल्या जात असून भाजपाच्या प्रचाराला डिजिटल माध्यमातून चांगलाच वेग मिळत आहे. रामलिंग शेरे यांना निवडून आणण्याचा निर्धार तरुणांनी केला असून, जवळगा मतदारसंघात भाजपाचा प्रचार झंझावाती रूप धारण करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

### बोलीमुळेच मराठी भाषा व संस्कृती समृद्ध होते - डॉ.सुनीता सांगोले

**लातूर :** मराठी भाषा संवादाचे प्रभावी माध्यम असून ती विविध बोलींनी नटलेली समृद्ध भाषा आहे.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या बोली मराठी भाषेच्या वैभवाचे प्रतीक आहेत.मराठी भाषेत कोकणी,पुणेरी,अहिराणी,मालवणी,माणदेशी,बेळगावी अशा विविधांगी बोली बोलल्या जातात.बोली ह्या भाषेचा भाग असतात,त्यातून समाजाची संस्कृती व परंपरा समृद्ध होते.बोलीच भाषेला समृद्ध करत असतात.प्रमाणभाषा ही लिखित असते.पण मनातल्या अंतरिक भावना बोलीतूनच सक्षमपणे मांडता येतात.बोलीत अनेक प्रभावी म्हणी,वाक्यप्रचार आहेत.याशिवाय आकलनाचा परिघ रूंदावण्यासाठी बोलीच महत्त्वाच्या आहेत.म्हणूनच बोलीविषयी मनात असलेले गैरसमज व न्यूनगंड टाळले पाहिजे.कारण बहिणाबाईने बोलीतूनच अप्रतिम काव्याची निर्मिती केली.बोलीचे सौंदर्य जपले पाहिजे.लहान वयापासूनच बोलीतूनच संस्कार होतात.बोलीसंदर्भात जास्तीत जास्त संशोधन झाले पाहिजे आणि मराठीतील बोलीचे जतन व संवर्धन झाले पाहिजे,असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनीता सांगोले यांनी केले.

## मुख्यमंत्र्यांचे औसा मतदारसंघावर विशेष लक्ष : आ. अभिमन्यू पवार

तभा वृत्तसेवा

**औसा, दि. ०३ फेब्रुवारी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे औसा मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष लक्ष असून नागपूरच्या विकास निधीच्या तुलनेतही औसा मतदारसंघाला लक्षणीय निधी देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील झपाट्याने विकसित होणाऱ्या दहा मतदारसंघांपैकी औसा मतदारसंघा एक ठरत आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आहे. औसा मतदारसंघाचा आमदार भाजपचा आहे आणि आता पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्येही भाजपचे प्रतिनिधित्व आवश्यक असून सर्व स्तरांवर भाजपचे प्रतिनिधित्व असेल, तर विकासकामांना अधिक गती मिळते आणि निधी आणण्यात कोणतीही अडचण राहत नाही असा विश्र्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे.

औसा तालुक्यातील बोरफळ येथे आयोजित जाहीर प्रचारसभेत बोलत होते. यावेळी मंचावर माजी आमदार दिनकरराव माने, सरपंच बजरंग जमादार, छाया पद्माकर चिंचोलकर,भाग्यश्री यादव आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, दिलीपराव देशमुख यांनी एकदा फोन करून शेतकऱ्यांच्या ऊस प्रश्नाबाबत विनंती केली. केवळ एका फोनवर मुख्यमंत्री तत्कालीन एकनाथ शिंदे



आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळाची मान्यता मिळवली आणि बेलकुंड कारखान्यासाठी १०९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. हा कारखाना शेतकऱ्यांचा आहे, त्यांच्या मदतीसाठी आहे. त्यामुळे आम्ही विकासाचे सकारात्मक राजकारण करतो.असे सांगून ते पुढे म्हणाले गावागावातील रस्ते, अंतर्गत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बेलकुंड एमआयडीसीच्या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे, जेणेकरून पुढील पिढीला पुणे, मुंबईसारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

पाण्याच्या प्रश्नावर बोलताना आमदार पवार म्हणाले , पश्र्चिम वाहिन्यांमधून समुद्रात वाहून जाणारे पाणी उचलून लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे औसा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती कायमस्वरूपी दूर होण्यास मदत होणार आहे.शेवटी मतदारांना आवाहन करताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, विकासाचा वेग अधिक वाढवायचा असेल, तर पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्येही भाजपला संधी द्या. सर्व स्तरांवर एकाच विचाराचे नेतृत्व असल्यास औसा मतदारसंघाचा विकास अधिक जलद आणि प्रभावीपणे होईल.असे मत आ. पवार यांनी व्यक्त केले.

## औसा आगाराकडून प्रवाशांना सापत्न वागणूक

तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** औशातील जवळपास ऐंशी टक्के लोक लातूरला विविध कामानिमित जात असतात. यात विद्यार्थी. व्यापारी, नोकरदार आणि करमत नाही म्हणून लातूरला जाऊन येऊ म्हणणारे हौशी अवलिये यात नोकरदार सोडले तर बाकी साधारपणे दुपारीच औशाला वापस जातात.

खरी परीक्षा होते ती नोकरदारांची कारण संध्याकाळी साडेसात सातपर्यंत औशाला येण्यासाठी बस मिळतात त्यानंतर मग सोलापूर, निलंगा, उमरगा या बसनी औसामोड कधीतरी नवीन बसस्टॅन्ड यात औसा आगाराची बस असते. ती म्हणजे लातूर ते सोलापूर जाणारी. याबस मध्ये औ शाचे प्रवाशी घेतले जात नाहीत. औसा आगाराची बस आहे का घेत नाही असे विचारले असता ही जादाची बस असल्याने थेट सोलापूरला जात असल्याचे कंडक्टर म्हणतात.

जादा बस असली म्हणजे प्रवाशी घेयचे नाहीत हा कुठला न्याय यात आगाराकडून



तशा सूचना आहेत की कंडक्टर मनमानी करतात हा वादाचा विषय आहे.

पूर्वी एस टी चे घोषवाक्य होते. हात दाखवा गाडी थांबवा. तेव्हा बरे असायचे कोणत्याही बस मधून प्रवास करायला यायचा पण आता सगळे.

औसा आगाराची बस औशाकडेच जाणारी पण औ शाच्या प्रवाशांना त्या बसमध्ये प्रवास करण्याची मुभा नाही हे विचित्र आहे. या प्रकरणात जो दोषी असेल त्यावर कारवाई होणे गरजेचे आहे असे असंख्य प्रवाशांचे मत आहे.

## अहिल्याबाई बंडगर यांनी साधला मतदारांशी संवाद

तभा वृत्तसेवा

**शिरूर अनंतपाळ, दि. ०३ फेब्रुवारी :** : येरोळ जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणाच्या प्रचाराचे वातावरण तापले आहे. काँग्रेसच्या येरोळ पंचायत समिती गणाच्या उमेदवार अहिल्याबाई प्रभाकर बंडगर यांनी दैठणा गावात भव्य प्रचार रॅली काढून मतदारांशी संवाद साधला व समस्या जाणून घेतल्या.शिरूर अनंतपाळ पंचायत समितीच्या येरोळ गणात काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होत आहे.

येरोळ पंचायत समिती गणाअंतर्गत येरोळसह, दैठणा, सुमठाणा, डिगोळ, चामरगा, बोळेगाव, धामणगाव, कारेवाडी, पांढरवाडी, हणमंतवाडी, जाभंळवाडी दगडवाडी, जोगाळा ही गावे येतात. येथील येरोळ पंचायत समिती गणात काँग्रेसच्या वतीने अहिल्याबाई बंडगर यांनी हजारो सर्मथकांच्या उपस्थितीमध्ये निवडणूक अर्ज भरून जोरदार प्रचारास सुरवात केली.

## कॉन्शिअस सेडेशन - बाल दंत उपचारातील सुरक्षित व प्रभावी पद्धत : डॉ. विश्वास पाटील

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** बाल दंत रोग उपचारांमध्ये मुलांची भीती, चिंता व वेदना कमी करून सुरक्षित आणि प्रभावी उपचार करण्यासाठी 'कॉन्शिअस सेडेशन' ही आधुनिक उपचार पद्धत अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या पद्धतीमुळे मुलांमध्ये दंत उपचाराची भीती दूर होऊन उपचार प्रक्रिया अधिक सुलभ, सकारात्मक व रुग्णस्नेही बनते, असे प्रतिपादन पुणे येथील बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. विश्वास पाटील यांनी केले.

येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या बाल दंत रोग विभागातर्फे 'बियोंड फिअर - कॉन्शिअस सेडेशन इन प्रॅक्टिस' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ विश्र्वास पाटील बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे निरीक्षक डॉ. मुकेश अर्दाळे, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. महेश दडपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. विश्र्वास पाटील म्हणाले की, कॉन्शिअस सेडेशन ही दंत उपचारांदरम्यान वापरली जाणारी सुरक्षित, वेदनाशामक व चिंता कमी करणारी पद्धत असून या प्रक्रियेत बाल रुग्ण पूर्णपणे शुद्धीत असतो. मात्र उपचारादरम्यान भीती, तणाव व वेदना लक्षणीयरीत्या कमी होतात. ही पद्धत जनरल ॲनेस्थेशियापेक्षा अधिक सुरक्षित मानली जाते.

'बियोंड फिअर' म्हणजे भीतीपलीकडे जाऊन उपचार करणे होय. बाल रुग्णांमध्ये सुई, दंत उपकरणांचा आवाज तसेच पूर्वीचे त्रासदायक अनुभव यांमुळे दंत उपचार करणे कठीण होते. मात्र कॉन्शिअस सेडेशनमुळे ही भीती कमी होऊन दंत चिकित्सक व रुग्ण यांच्यात सकारात्मक सहकार्य निर्माण होते. ३ ते १४ वयोगटातील मुले, अत्यंत भीतीग्रस्त किंवा सहकार्य न करणारी मुले, दीर्घ व वेदनादायक उपचार आवश्यक असलेले रुग्ण तसेच विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी ही पद्धत विशेष प्रभावी ठरते, असे त्यांनी सांगितले. या उपचारांमध्ये नायट्रस ऑक्साइड-ऑक्सिजन इनहेलेशन सेडेशन ही सर्वाधिक वापरली जाणारी पद्धत आहे. मास्कद्वारे नायट्रस ऑक्साइड व ऑक्सिजन दिल्यानंतर काही मिनिटांतच रुग्ण शांत होतो, चिंता व वेदना कमी होतात आणि आनंदी भावना निर्माण होतात. ही पद्धत सुईविरहित, सुरक्षित, जलद परिणाम देणारी असून उपचारानंतर रुग्ण लगेच घरी जाऊ शकतो.

कॉन्शिअस सेडेशन करताना रुग्णाची सविस्तर वैद्यकीय माहिती, योग्य रुग्ण निवड, प्रशिक्षित दंत चिकित्सक व कर्मचारी, ऑक्सिजन सॅच्युरेशन व हृदय गतीचे सतत निरीक्षण तसेच आपत्कालीन औषधे व उपकरणांची उपलब्धता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट करुन तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार केल्यास ही पद्धत अत्यंत सुरक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले.

## वैभवी मानेचे राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत रौप्यपदक

तभा वृत्तसेवा

**अहमदपूर, दि. ०३ फेब्रुवारी :** इंफाळ (मणिपूर) येथे आयोजित करण्यात आलेल्या ६९ व्या नॅशनल स्कूल गेम्स अंतर्गत १९ वर्षांखालील राष्ट्रीय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेत लातूर जिल्ह्याची खेळाडू वैभवी प्रशांत माने हिने उल्लेखनीय कामगिरी करत इप्पी सांघिक प्रकारात रौप्यपदक पटकावले.

वैभवी प्रशांत माने सध्या महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर येथे इयत्ता बारावी सायन्स वर्गात शिक्षण घेत असून, येत्या काही दिवसांत तिच्या बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. अभ्यास आणि क्रीडा क्षेत्र या दोन्हींचा समतोल साधत तिने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून विविध राज्यांतील उत्कृष्ट खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये वैभवीने आपल्या संघासोबत उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, संयम आणि आत्मविश्वास दाखवत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली व रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

वैभवी प्रशांत माने हिला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. दत्ता भाऊ गलाले, वजीरोदीन काजी, मोसिन शेख, रोहित गलाले, आकाश बनसोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत खेळाडूंचे जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर, शिवछत्रपती क्रीडा




जीवनगौरव पुरस्कार प्राप्त गणपतराव माने, सिनेट सदस्य डठढचण, छरपवशव श्री. तळपेव चरपश ,लातूर तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष अभिजीत मोरे, प्रा. शरद माने, मु. अ. प्रशांत माने, संतोष कदम, वैभव कज्जेवाड, मेहफूजखान पठाण लातूरच्या सर्व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे.

वैभवी प्रशांत माने हिला तिच्या या दैदीप्यमान यशाबद्दल हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## ध्येय सिद्धीसाठी जिज्ञासू राहून सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक - डॉ.अशोक मोटे

तभा वृत्तसेवा

**निलंगा, दि. ०३ फेब्रुवारी :** विद्यार्थ्यांनी आपल्या ठरवलेल्या ध्येय सिद्धीसाठी जिज्ञासू राहून सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास निश्चितच यशप्राप्ती होते असे प्रतिपादन डॉ अशोक मोटे (सिनेट सदस्य, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड) यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदोपासक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेश वलांडे होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव रमेश बगदुरे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ शंकर कल्याणे, पदवी वितरण समारंभ समिती समन्वयक प्रो.मोहन बंडे, प्रा.प्रसाद ताडमुगळीकर, लेफ्टनंट डॉ.जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.विनोद चिंते, डॉ. विनोद जाधव, डॉ. विजयकुमार पवार, प्रा.विजयकुमार हंडे, डॉ.रितेश व्यास, डॉ. सुचिता किडीले इत्यादी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.अशोक मोटे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आई-वडीलांच्या कष्टाची कायम जाणीव ठेऊन जिद्द, चिकाटी, आत्मविश्र्वास, शिस्त, सकारात्मक दृष्टिकोन, संयम इत्यादी गुणसंपदा सदैव अंगी बाळगावी असे सांगितले. संपादन केलेली पदवी ही अभ्यासाची फलनिष्पत्ती असून यापुढील काळात स्वावलंबी व सुजाण नागरिक बनून समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी आपल्या



दैनंदिन अभ्यासासोबतच अंगभूत कला व कौशल्ये विकसित करावीत असेही त्यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव रमेश बगदुरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. संगीत विभागप्रमुख प्रा.दुर्गादास सबनीस व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत सादर केले. राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे लेफ्टनंट डॉ. जाफर चौधरी यांच्या मार्गदर्शनात रा.छा. से. कॅडेट्सनी विद्यापीठ ध्वज वहनावेळी पायलट दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आनंद मुसळे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रो.मोहन बंडे यांनी मानले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळेस बी.ए., बी.कॉम., बी.सी.ए. व एम.एस्सी.एस.ई. विद्याशाखेतील एकूण ९५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

याप्रसंगी संस्था संचालक मडोळय्या मठपती, दगडू गिरबने, अनिल डोईजोडे, प्रा.श्रीकांत ढेबे, विलास होटकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. पदवी वितरण समारंभाच्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या विविध समित्यांमधून प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# त्या" तलाठ्याला खुलासा सादर करण्याचे आदेश.!

रामप्रसाद कंठाळे

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील करपरा नदीपात्रातून अवैध रित्या वाळू उपसा करून ती इतरत्र ट्रकटर द्वारे वाहतूक करत असतांना दुधगाव सज्जाचे तलाठी शेख खलील यांनी कोणतीही कार्यवाही न करताच सोडून दिल्याचा प्रकार उघडकीस आला होता या बाबत विविध दैनिकातून बातम्या प्रकाशित होताच तहसीलदार शीतल कच्छवे यांनी दि ३० जानेवारी रोजी तलाठी शेख खलील यांना नोटीस बजावत तीन दिवसांच्या आत लेखी खुलासा प्रत्यक्ष हजर राहत सादर करण्याचे आदेशीत केले आहे या बाबत अधिक माहिती अशी की दुधगाव सज्जाचे तलाठी शेख खलील हे पूर्वी पासूनच वादग्रस्त असून त्यांनी दि २७ जानेवारी रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास वाळू ची अवैध वाहतूक करणार ट्रकटर होता.सदर पकडलेल्या ट्रकटर च्या हेडवर बसून त्यांनी एक ते दीड किलोमीटर अंतर ही पार केले त्या नंतर ट्रकटर मालक घटनास्थळी आल्यावर त्याच्याशी झालेल्या सभाषणांतर सदरील ट्रकटर च्या हेडवरून खाली उतरून त्यांनी कोणतीही कार्यवाही न करता ट्रकटर सोडून दिला या बाबत वेगवेगळ्या दैनिकातून तलाठी शेख खालील याच्या बातम्या फोटो सह प्रसिद्ध झाल्यानंतर महसूल प्रशासन खडबडून जागे झाले तहसीलदार शीतल कच्छवे यांनी दि ३० जानेवारी रोजी काही वर्तमानपत्र व गावकऱ्यांच्या निवेदनाचा संदर्भ



देत तलाठी शेख खलील यांना तीन दिवसांच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेशीत केले खुलासा सादर न केल्यास योग्य ती कार्यवाही करण्याचेही नमूद करण्यात आले आहे.

ट्रकटर हेडवर बसलेल्या तलाठ्याचे फोटो दि २७ जानेवारी रोजी अवैध वाळू ने भरलेल्या ट्रकटर च्या हेडवर दुधगाव सज्जाचे तलाठी शेख खलील हे बसलेले असल्याचे छायाचित्रात स्पष्ट दिसून येत आहे.आणि या दिवशी त्यांनी एकाही अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकटर वर कार्यवाही केली नाही. हे स्पष्ट असतानाही केवळ या तलाठ्याला वाचवण्यासाठी महसूल विभागातील काही अधिकरी, कर्मचारी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असून त्यामुळेच सर्व काही माहीत असतानाही केवळ गावकऱ्यांचा समज काढण्यासाठी नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आल्याची चर्चा तहसील कार्यालयात होत आहे. लाठ्याच्या मोबाईल चा सी डी आर काढण्याची मागणी दुधगाव सज्जाचे तलाठी शेख खालील यांचा वाळू माफियांशी सलोख्याचे संबंध

असून ते संबंध जोपाण्यासाठीच त्यांनी सदरील ट्रकटर वर कार्यवाही न करताच तो सोडून दिल्याची चर्चा गावकऱ्यात असून तलाठी शेख खालील यांच्या मोबाईल चे रिकार्ड तपासल्यास सत्य बाहेर येण्याची दाट शक्यता आहे

## संक्षिप्त वृत्त...

### मराठी भाषा ही समृध्द वारसा जतन करते : प्राचार्य डॉ. बबन पवार :

शारदा महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठी भाषेला समृद्ध असा वारसा लाभला असून भाषा ही समृद्ध वारसा जतन करते त्यामुळेच अभिजात मराठी भाषेचा दर्जा देऊन भाषेचा गौरवही करण्यात आला आहे, असे मत प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी व्यक्त केले.

येथील शारदा महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. नितीन बावळे, प्रा. सुनील बल्लाळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष नाकाडे उपस्थित होते. यावेळी बोलीच्या अनुषंगाने संत तुकाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी परळे यांनी बोलीभाषेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने काव्यवाचन, कथाकथन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. हनुमंत शेवाळे व प्रा. डॉ. रत्नाकर कांबळे उपस्थित होते.

यावेळी प्रा. डॉ. संतोष नाकाडे, डॉ. नितीन बावळे, डॉ. सुनील बल्लाळ व फायजा शेख यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कु. श्रद्धा अडने, कु. सानिका चव्हाण, कु. वैभवी साबळे यांनी कथाकथन केले तर कु. राधा साबळे, उज्वल भाग्यवंत, विनोद कराळे, संदीप दांडगे, ऋषिकेश मस्के, कु. सानिका चव्हाण, कु . राहत परवीन, कु. सानिका चव्हाण, गणेश घाडगे, कु. मुस्कान पठाण यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. कु. श्रद्धा अडने या विद्यार्थिनीने आपली लोकसंस्कृती या विषयावर तर कु. सानिका चव्हाण हिने मराठी बोली भाषा या विषयावर भित्तीपत्रके रेखाटली, या भित्तीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सूत्रसंचालन कु. वैभवी साबळे, प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. उज्वला जगताप यांनी तर आभार प्रदर्शन कु. मुस्कान पठाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. सचिन खडके, कार्यालय प्रमुख सुरेश जयपूरकर, तनुजा रासवे, जावेद शेख, राजाराम मुत्रटकर यांनी प्रयत्न केले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी ३ ते ६ फेब्रुवारीदरम्यान टपाली मतदान : मतदानाचा कार्यक्रम जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असलेल्या तसेच टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.टपाली मतदान प्रक्रिया ३ ते ६ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिंतूर येथील गुरु नथुराम महाराज केहाळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे राबविण्यात येणार आहे. निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असून टपाली मतपत्रिकेची मागणी केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठरवून दिलेल्या वेळेत व ठिकाणी उपस्थित राहून आपले मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश लाहोटी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शीतल कच्छवे यांनी केले आहे.

### तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची भाजपा गटनेतेपदी अधिकृत निवड : विभागीय आयुक्त कार्यालयात निवड प्रक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या गटनेता पदासाठी आज सोमवार २ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकृतरित्या निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत सर्व नगरसेवकांच्या एकमताने श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची भाजपा गटनेता म्हणून निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर, संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या सूचनेनुसार तसेच निवडणूक प्रमुख सुरेशराव वरपूडकर व रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यापूर्वी २२ जानेवारी रोजी परभणी महानगर कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी भूषविले. निवडीचा प्रस्ताव सूचक म्हणून डॉ. केदार लक्ष्मणराव खटिंग यांनी मांडला तर प्रस्तावास रितेश कांतीलाल झांबड (जैन) यांनी अनुमोदन दिले. या अधिकृत निवडीबद्दल सर्व नगरसेवकांनी श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांचे अभिनंदन केले. भाजपा नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली परभणी महानगरपालिकेत विकासाभिमुख व लोकहिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्यासह सौ. तिरुमला मुकुंद खिल्लारे, सौ. वैशाली दत्तात्रय दैठणकर, सौ. सपना व्यंकटेश जुकटे, विश्वजीत बुधवंत, गणेश टाक, रितेश जैन, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. मीना सुरेशराव वरपूडकर, सौ. निर्मला बालासाहेब वाघमारे, सौ. सुशीला जिजाजी थोरात, अद्वैत सांगळे तसेच डॉ. केदार खटिंग हे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## संत जनाबाई महाविद्यालयात सॉफ्ट स्किल ट्रेनिंग प्रोग्रामचा १५२ विद्यार्थिनींनी घेतला लाभ

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** संत जनाबाई महाविद्यालयात सॉफ्ट स्किल ट्रेनिंग प्रोग्रामचा १५२ विद्यार्थिनींनी घेतला लाभ.

शहरातील संत जनाबाई शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पीएम उषा योजनेअंतर्गत सॉफ्ट स्किल ट्रेनिंग प्रोग्रामच्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले श्री संत जनाबाई महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पीएम उषा योजने अंतर्गत (दिनांक ३ फेब्रुवारी मंगळवार) रोजी सॉफ्ट स्किल कोर्स घेण्यात आला यामध्ये १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोदविला सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्कील ट्रेनिंग प्रोग्राम



प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.एम.धूत होते. कार्यक्रमादरम्यान पी.एम. उषा संयोजक डॉ.संजीवकुमार क्षीरसागर,उपप्राचार्य चंद्रकांत सातपुते, कम्युनिकेअरचे संचालक प्रा.कुशल राऊत,प्रा. डॉ.राने यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यकमास आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोर्स कोआर्डिनेटर प्रा.डॉ.सचिन कलमे यांनी केले. तर सूत्रसंचलन प्रा.कैलास गिरी यांनी केले आभार प्रा.अमोल करपे यांनी मानले.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी गौरी जोशी,ओमकार गुट्टे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासप्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गंगाखेडात १४ फेब्रुवारी रोजी विधी सेवा महाशिबीराचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती, गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन यांच्यावतीने १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता गंगाखेड येथील परळी रोडवरील कापसे मंगल कार्यालयात शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या महावेळाव्याचा मुख्य विषय ज्येष्ठ नागरीकांसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

### मानवत येथे श्री विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**महेश दिशागत**

**मानवत । प्रतिनिधी** - भारतीय संस्कृतीतील देवशिल्पी मानले जाणारे भगवान श्री विश्वकर्मा यांची जयंती शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी मानवत शहरात भक्तिभाव व उत्साहात साजरी करण्यात आली.




या निमित्ताने आयोजित महोत्सवात सकाळी भगवान श्री विश्वकर्मा देवतेचे पूजन व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ह.भ.प. श्री रामराव हेंडगे (गुरुजी), मानवत यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून महाराजांनी श्रमसंस्कृती, सर्जनशीलता व कारागीर वर्गाच्या योगदानाचे महत्त्व विशद केले.

यावेळी श्री विश्वकर्मा देवतेच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. उपस्थित भाविकांनी समाजातील कारागीर, शिल्पकार, अभियंते व कामगार वर्गाच्या प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. श्री विश्वकर्मा जयंतीनिमित्त परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

### दोन वाहने दाखल

**मानवत । प्रतिनिधी** अप्पर पोलिस महासंचालक बिनतारी संदेश व वाहतूक यांच्या कडून परभणी पोलिस दलास दोन अत्याधुनिक सर्व्हेलन्स व्हॅन नुकत्याच प्राप्त झाल्या आहेत.

या व्हॅन सीसीटीव्ही कॅमेरे, फ्लड लाईट, लाईव्ह मॉनिटर तसेच पब्लिक ॲड्रेस सिस्टीम यांसारख्या आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहेत. या व्हॅनमधून लाईव्ह स्ट्रिमिंग करण्याची सुविधा देखील देण्यात आलेली आहे. तसेच व्हॅनमध्ये कार्यरत पोलिस अंमलदारांसाठी पिण्याचे पाणी, लाठी ठेवण्यासाठी स्टँड तसेच आरामदायक आसन व्यवस्था उपलब्ध आहे. बंदोबस्ताच्या वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपूर्ण परिसराचे निरीक्षण करता यावे, यासाठी व्हॅनच्या वरच्या भागात उभे राहण्याची व बसण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे.

## जि.प.मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या अनुषंगाने शनिवार दि. ०७ फ ेब्रुवारी, २०२६ रोजी संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, मानवत, पाथरी, पुर्णा, सेलु, जिंतुर, सोनपेठ, पालम या जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्य निवडणुक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे राज्य शासनाने अधिसूचनेमध्ये जाहिर केले आहे.

हे आदेश मतदार संघातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी सुट्टी देण्याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी, व्यवस्थापनाने वरील आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांना मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सरकारी कामगार अधिकारी टि.ई.कराड यांनी कळविले आहे.

## पालम तालुका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी उमेदवार लागले लक्ष्मी अस्त्राच्या कामाला

**पालम ,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचाराला वेगाने असून मतदार संघामध्ये उमेदवार मात्र मतदारांच्या अडचणी सोडविण्यात तत्पर आहोत असे आश्वासने देऊन मोकळे होत आहे. आपण मतदारांसाठी किती सक्षम आहोत हे दाखवून देण्यातमग्न आहेत मात्र धनलक्ष्मी पुढे पुढचा विकास मात्र नंतर टप्प पडत आहे जि.प. गटात व पं.स. गणत उमेदवारांची प्रचार चालू आहे.

गावातील तरुण युवक मोबाईलचा व्हाट्सअप, फ ेसबुक वर उमेदवाराचे स्टेटस ठेउन उमेदवारांचे चिन्ह व फोटो दिसत आहेत. पालम तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये विकासाच्या योजना आता फक्त नावालाच राहिला आहे. यामुळे गावाचा विकासाचा प्रश्न मात्र यापुढे आयरणी वरच राहणार हे मात्र तितकेच खरे आहे. मात्र धनलक्ष्मी पुढे गावाच्या विकासाला मुकावे लागणार तालुक्यात ग्रामीण भागातील समस्या खूप मोठे आहेत आजही अनेक गावात रस्ते नाही काही भागात पाण्याची सुविधा नाही तर काही जागी दवाखान्याची सुविधा नाहीत धनलक्ष्मी पुढे गावगाड्यांचा विकास तरी कसा होणार, साहेब माझ्या कडे जास्त मतदान आहे तुमच्या कडे केव्हा येऊ उमेदवाराना काही मंडळी मोबाईलद्वारे किंवा मॉसेज व उमेदवाराना जवळच्या मानसाला सांगुन उमेवारा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत आहे. उमेदवाराला जर माहित झाले की बोलवा त्यांना मला ऐऊन भेटा असा निरोप पाठवत आहेत. तसेच ऊमेदवाराना गाठून आपली सोय करून घेत आहेत. धनलक्ष्मीने घेतला मतदाराचा आधिकार

मताचा अधिकार मोलाचे मानले जाते मात्र धनलक्ष्मी पुढे मतदाराचे आधिकार नाहिसे झाले आहे. धनलक्ष्मी पुढे जर मताची किंमत ठरत असेल तर मताचा पावर कमीच होणार उमेदवार साहेब आमची काही सोय आहे का नाही ? पालम तालुक्यात ग्रामीण भागात अनेक विकासाचे मुद्दे प्रलंबित आहेत; परंतु गावातील काही युवक शेतात राबतात, तर सायंकाळी कुठल्या तरी उमेदवारास आमची सोय आहे का ? असे मेसेज पाठवत असल्याचे चित्र आहे. यापूर्वीच्या निवडणुका सार्वजनिक विकासासाठी




व्हायच्या. आतामात्र विकासाच्या मूळ उद्दिष्टापासून भरकटल्या असून, त्याची जागा आता मटण - दारू च्या पार्टा तसेच लक्ष्मी अस्त्राने जागा घेतली आहे.

## अग्रलेख...

# पुरोगाम्यांचा संस्कृतिसंभ्रम!

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वाटचालीस पुरोगामित्वाचा मुलामा चढविण्याचे कार्य करणाऱ्यांच्या यादीत अलिकडच्या काळातील क्रांतिकारी नेता म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांचे नाव आघाडीवर राहिले आहे. मुळात, महाराष्ट्र हे खरोखरीच पुरोगामी विचारांचेच राज्य होते. या राज्यात समाजसुधारणेची सुरुवातच पुरोगामी विचार रुजविण्याच्या प्रक्रियेतून झाली. परंपरेच्या नावाखाली पाळल्या जाणाऱ्या पुराणातील प्रथांना मूठमाती देऊन नव्या जमान्याशी जुळतील, अशा विज्ञाननिष्ठ विचारांची पाळेमुळे या राज्यात रुजली होती आणि येथूनच त्यांचा देशभर प्रसार झाला होता, असे इतिहास सांगतो. ज्यांच्या संस्कारामुळे महाराष्ट्रास पुरोगामी विचारांचे राज्य म्हटले जाऊ लागले, त्या छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे बाबा आणि अशा कितीतरी लोकांचा वैचारिक वारसा राज्याला लाभलेला आहे. पण, केवळ या सुधारकांच्या नावाचा ऊठसूठ जप केला, त्यांच्या नावाच्या घोषणा दिल्या किंवा त्यांच्या नावांचा मुलामा योजनांवर चढविला म्हणजे या महापुरुषांचे कार्य पुढे नेल्याचे, त्यांचा वारसा चालविल्याचे श्रेय मिळेल, अशी भावना दुर्दैवाने बळावत गेली. कदाचित त्यामुळेच, आजकाल राजकारणात, सामाजिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रात जे काही घडताना दिसते, त्याला पुरोगामित्वाचा तोंडवळा खरेच आहे का, असा प्रश्न पडण्यासारखी स्थिती निर्माण झाली असावी. पुरोगामित्व हा केवळ कागदावरचा विचार नव्हे, तर ती कृतिशीलतेतून दाखवून देण्याची बाब आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक वाटचालीच्या इतिहासात तसेच घडले आहे. पण, अलिकडे मात्र ते इतिहासजमा होत चालले असून, पुरोगामित्वाचा डिंडिम वाजवत प्रत्यक्षात मात्र राज्याला प्रतिगामी दिशा देण्याचेच काम सुरू झाल्याचे अनेक घडामोडींवरून दिसून येऊ लागले आहे. तसे नसते, तर राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यावर धर्मशास्त्राच्या नियमांचा मारा करून त्यांना दोषी ठरविण्याचा निर्णय घेण्याची जोरदार स्पर्धा सुरू झाली नसती. या राज्याने महिलांना समान संधी, सत्तेतील समान वाटा, स्त्रीयांना समाजाचा समान हक्कदार घटक मानले आहे, असे सांगणारे महिला धोरण सुमारे तीन दशकांआधी महाराष्ट्रात जाहीर झाले, तेव्हा राज्याचे देशभरात मोठे कौतुक झाले होते. तेव्हाचे मुख्यमंत्री शरद पवार हे शाहू-फुले, आंबेडकरांच्या सुधारक विचारांचे खरे वारस असल्याचा निर्वाळाही अनेकांनी दिला होता. या महिला धोरणाचे गोडवे अजूनही गायिले जात असताना सध्या सुरू असलेल्या राजकीय प्रतिगामित्वामुळे एक प्रश्न मात्र पुनःपुन्हा ठळकपणे अधोरेखित होऊ लागला आहे. तो म्हणजे, ज्या परंपरेचे आपण सातत्याने गोडवे गातो, ज्या परंपरेचे पाईक म्हणून आपण सतत आपली पाठ थोपटून घेतो, ती पुरोगामी परंपरा म्हणजे अलिकडच्या काळातील आपला खरा चेहरा आहे, की तो केवळ राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक मुखवटा आहे?

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महिला प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी दीर्घकाळ कल्याणकारी चौकटीत अडकलेली राहिली. अनुदाने, सवलती, योजना, यांच्या पलीकडे जाऊन महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानणारे धोरण क्वचितच मांडले गेले. अशा पृष्ठभूमीवर शरद पवारांनी जाहीर केलेले महिला धोरण हा केवळ एक प्रशासकीय दस्तऐवज नव्हते, तर राज्याच्या सामाजिक दिशादर्शक राजकारणाचे ते महत्त्वाचे विधान (स्टेटमेंट) होते. महिलांकडे केवळ 'लाभार्थी' म्हणून नव्हे, तर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक निर्णय प्रक्रियेतील घटक म्हणून पाहण्याची स्पष्ट भूमिका त्यामागे होती. स्वयंरोजगार, बचतगट, शिक्षण, आरोग्य, पोषण, पाणी आणि सुरक्षितता या मुद्द्यांचा एकत्रित विचार करून महिलांचे आयुष्य विभागनिहाय नव्हे, तर समग्र सामाजिक वास्तव म्हणून या धोरणातून मांडले गेले होते. ग्रामीण महाराष्ट्रातील महिला हा या धोरणाचा खरा केंद्रबिंदू होता. शेतकरी कुटुंबातील स्त्री ही केवळ घरकाम करणारी नव्हे, तर शेती, अर्थव्यवस्था आणि कुटुंबाच्या स्थैर्याची आधारस्तंभ आहे, ही जाणीव धोरणात प्रकर्षाने उमटत होती. त्यामुळेच ग्रामीण महिलांनी या धोरणाकडे संशयाने नव्हे, तर अपेक्षेने पाहिले. महत्त्वाचे म्हणजे, या धोरणाला तत्कालीन राजकीय विरोधाचा तीव्र सामना करावा लागला नाही. "अंमलबजावणी निर्णायक ठरेल" अशा टिपण्णींसह का होईना, पण या धोरणाची गरज बहुतेकांनी मान्य केली. हेच या धोरणाचे तेव्हाचे निर्विवाद अप्रत्यक्ष यश ठरले होते. या धोरणामागे दीर्घकालीन सामाजिक बदलाची राजकीय समज होती. सन्मान, स्वावलंबन आणि सहभाग हे तीन स्तंभ त्या धोरणाचे मूळ होते.

फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारसरणीत केंद्रस्थानी असलेला महिला सक्षमीकरणाचा मुद्दा आधुनिक राजकारणात उतरविण्याचा प्रयत्न असल्याची स्तुतिसुमने त्या धोरणावर उधळली गेली होती. त्यामुळे ते धोरण आज केवळ इतिहासाचा भाग नसून, महिला सबलीकरणाचा मापदंड ठरेल, अशी महाराष्ट्राची अपेक्षा होती. कारण ते धोरण केवळ महिलांसाठी नव्हे, तर महाराष्ट्राच्या सामाजिक भविष्याचे धोरण ठरावे, असे मानले जात होते. आज, सुमारे तीन दशकांनंतर, जेव्हा सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हा मात्र या अपेक्षांचीच निराशा झाली आणि महाराष्ट्र खरोखरीच पुरोगामी आहे, की पुरोगामित्व हा महाराष्ट्राचा केवळ सोयीचा मुखवटा आहे, असा प्रश्न अधोरेखित झाला आहे. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एकाच वेळी अभिनंदनाची आणि लगेचच संशयाचीदेखील प्रतिक्रिया उमटली. ही दुटप्पी प्रतिक्रिया योगायोगाने आलेली नाही; ती महाराष्ट्राच्या महिलाविषयक पुरोगामी दाव्यांची आणि राजकीय व्यवहारातील विसंगतींची साक्ष आहे, असेच म्हणावे लागेल. कारण, महाराष्ट्रावर खरोखरीच पुरोगामी विचारांचे संस्कार घडले असते किंवा पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणाऱ्यांनी या वेळी ते कृतीशीलपणे दाखविले असते, तर परंपरांचा आणि प्रतिगामी प्रथांचे दाखले देऊन त्यांच्या निर्णयास चूक ठरविण्याचा कोतेपणा कोणी दाखविला नसता. सुनेत्रा पवार यांनी पतीच्या निधनानंतर लगेचच सत्ताकारणात उडी घेतल्याबद्दल त्यांचे स्वागत करावयाचे, की सुतक आदी प्रतिगामी कल्पनांचा कोलदांडा उभा करून त्यांच्या निर्णयावर नाके मुरडायची, हे पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्राने ठरवायला हवे होते. शरद पवार यांच्याच ज्या महिला धोरणाने महिलांना कागदावरचे हक्क बहाल केले, सत्तेच्या वाटणीचा अधिकार आणि आत्मविश्वासही दिला, प्रतिनिधित्वाचा हक्क दिला, ते धोरण म्हणजे केवळ कागदी दस्तावेज असून, प्रत्यक्षात मात्र, महिलांना प्रथा परंपरांच्या पिंजऱ्यातच कोंडून ठेवायची मानसिकता आहे का, अशी शंका यामुळे व्यक्त होऊ लागली आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपद ग्रहणानंतर, एका बाजूला 'महिला सत्तेच्या केंद्रात' या पुरोगामी विचारांच्या कृतीचा क्षण साजरा झाला. पण, लगेचच दुसऱ्या बाजूला संधींचे केंद्रीकरण, रीत-रिवाज, परंपरा आणि थेट धर्मशास्त्रावरही बोट ठेवले गेले. त्यामुळेच महिला सत्तेत येते, तेव्हा महाराष्ट्राचे ते पुरोगामी महिला धोरण पुढे नेण्याचा वारसा ती चालविते का, हा प्रश्न या दोन्ही प्रतिक्रियांपलीकडे जाऊन विचारला गेला पाहिजे. सध्याच्या स्थितीत याचे उत्तर तडकाफडकी देता येणार नाही. परिस्थितीचे नेमके आकलन करून घेऊन, त्यावर विवेकी विचार करून प्रामाणिकपणे शोधले तरच त्याचे उत्तर सापडू शकेल आणि कदाचित त्यामुळे अंतर्मुख होण्याचीच वेळ येईल.

सुनेत्रा पवार यांची शपथ महिला सक्षमीकरणाचे प्रतीक मानली जात असेल, तर त्याची कसोटी कठोर असली पाहिजे. केवळ परंपरा आणि धार्मिक प्रथांचे दाखले देऊन प्रश्न उभे केल्यास पुरोगामी विचारसरणीतील सांस्कृतिक संभ्रमच नाहक समोर येण्याची शक्यता अधिक आहे. सुनेत्रा पवार यांनी ज्या परिस्थितीत हे पद स्वीकारले, ती परिस्थिती काहीशी कठीणच होती, यात कोणतेच दुमत नाही. पण, त्याही परिस्थितीत पुराणप्रथांना कवटाळून न राहता त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला. याकडे खरे तर पुरोगामी दृष्टिकोनातून पाहिले, तर त्याचे स्वागत व्हावयास हवे होते. पण, तसे होण्याऐवजी गदारोळाच अधिक माजतो, तेव्हा पुरोगामी परंपरेचे पाईक म्हणविणाऱ्यांच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्हे उमटतात. महाराष्ट्राला महिलांचे नेतृत्व नवे नाही. पण, महिला धोरणाने दिलेल्या आत्मविश्वासानुसार ठाम भूमिका घेणारे नेतृत्व दुर्मिळ होते. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर आणखी एक अस्वस्थ करणारा प्रश्नदेखील उभा राहिला आहे. एखाद्या दुर्दैवी कौटुंबिक परिस्थितीत राजकीय वारसा पुरुषांकडे गेला, तेव्हा तो 'अनुभवाचा लाभ' ठरतो; पण हाच वारसा स्त्रीकडे गेला, तर मात्र तो 'अनुचित सवलत' ठरतो. सध्याच्या गदारोळामुळे तसेच काहीसे होताना दिसत आहे, आणि ही दुटप्पी कसोटीच महाराष्ट्राच्या पुरोगामी असण्याच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उभे करीत आहे. आजचा महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांची परंपरा सांगतो. पण, ही परंपरा आठवण म्हणून जपली जाऊ नये; तर धोरण म्हणून राबवली जावयास हवी. अन्यथा तिचे राजकीय मूल्य संपुष्टात येईल. महाराष्ट्राची महिला हा केवळ चेहरा नव्हे, तर स्वतंत्र अस्तित्व असलेली व्यक्ती आहे, हे दाखवून देण्याची कसोटी सुनेत्रा पवार यांना पार पाडावी लागणार आहे. त्यात त्या यशस्वी झाल्या, तर ही सत्ता महिला धोरणाची धार वाढवेल, की त्या धोरणावरच पडदा टाकेल, हे ठरणार आहे. शिवाय, पुरोगाम्यांना संस्कृतिसंभ्रमातून बाहेर काढण्याची संधीही त्यातून साधता येईल.

---

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# अमेरिका-'जमात'च्या हातमिळवणीचा धोका

अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलिकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनूस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हेही शत्रुपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपरिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रति त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलिकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले की, पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्द्यांवर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात अयोध्येत वादग्रस्त ढांचा पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदुविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ने मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार एक डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले की, देश इस्लामिक झाला आहे आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले की, जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या की, डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या की, बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे. तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढिवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली, तर अमेरिका बांगलादेशच्या मोठ्या कापड उद्योगावर काही बंधने घालू शकेल. अधिकाऱ्याने सांगितले की, बांगला देशच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग अमेरिकेवर अवलंबून आहे. त्यांनी बांगलादेशच्या कापड निर्यातीचा उल्लेख केला. यामुळे भारताची चिंता कमी होण्याची शक्यता नाही.

भारताने २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील 'जमात-ए-इस्लामी'च्या शाखेला बेकायदेशीर गट घोषित केले आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यावर बंदी घातली. १९७५ आणि १९९३ मध्ये येथे 'जमात-ए-इस्लामी'वर बंदी घालण्यात आली होती. 'जमात-ए-इस्लामी'चे अमेरिकन प्रवक्ते मोहम्मद रहमान यांनी एका निवेदनात म्हटले की, आम्ही एका खाजगी राजनयिक बैठकीदरम्यान केलेल्या कथित टिप्पण्यांवर भाष्य करू इच्छित नाही.

गेल्या काही महिन्यांमध्ये भारत-अमेरिका संबंध बिघडत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या स्थापनेपासून भारत आणि बांगलादेशमधील संबंध इतिहासातील सर्वांत खालच्या टप्प्यावर पोहोचले आहेत. 'जमात-ए-इस्लामी'शी वाढू शकणारे अमेरिकेचे संबंध अमेरिका आणि भारत यांच्यात आणखी दरी निर्माण करू शकतात. अनेक वर्षांपासून 'जमात-ए-इस्लामी' भारताचा सर्वांत मोठा शत्रू आहे. भारत या पक्षाला पाकिस्तानचा मित्र मानतो आणि प्रादेशिक सुरक्षा धोरणासाठी धोका म्हणून पाहतो. अमेरिका-भारत संबंध चांगल्या स्थितीत असते, तर अमेरिका निवडणुकीपूर्वी 'जमात-ए-इस्लामी'बद्दलच्या भारतीय चिंतांकडे लक्ष देण्यास तयार झाली असती; परंतु आता ते शक्य नाही.

बांगलादेश हा राजकीय गोंधळातून जन्मलेला देश आहे. १९७१ मध्ये झालेल्या युद्धानंतर पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळाले, तेव्हापासून बांगलादेशने लष्करी उठाव, हुकूमशाही आणि प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेतृत्वाखाली अशांततेचा सामना केला आहे. भारत-बांगलादेश संबंध आधीच अनिश्चित स्थितीत आहेत. शेख हसीना भारताच्या जवळच्या मित्र मानल्या जात होत्या आणि त्यांना सत्तेवरून काढून टाकल्यापासून त्या भारतात राहत आहेत. नोव्हेंबरमध्ये बांगलादेशच्या एका न्यायाधिकरणाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. त्यांना किमान १,४०० निदर्शकांच्या हत्येसाठी जबाबदार ठरवले. बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या विनंतीला न जुमानता भारताने त्यांचे ढाका येथे प्रत्यार्पण केले नाही. डिसेंबरमध्ये झालेल्या बैठकीत एका अमेरिकन राजनयिकाने म्हटले होते की, हसीनाला दोषी ठरवणे राजकीयदृष्ट्या योग्य होते. न्यायाधिकरण 'स्वतंत्र आणि निष्पक्ष' नव्हते; परंतु हसीना दोषी आहेत. भारतावर 'जमात-ए-इस्लामी'चा राग आणि युनूस यांचीही तशीच भूमिका हे सारे पाहता अमेरिकेचे त्यांच्याशी वाढत चाललेले मैत्रीपूर्ण संबंध दक्षिण आशियातील राजनैतिक समीकरणांवर प्रतिकूल परिणाम घडवतील. अमेरिकेला शेख हसीना कधीच आवडत नव्हत्या. तसेच अमेरिकेला बांगलादेशमध्ये भारताचा प्रभाव मान्य नव्हता. बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान नरसंहार करणाऱ्या पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा देणाऱ्या 'जमात-ए-इस्लामी'चे हात रक्ताने माखले आहेत. ती बांगलादेशमधील धर्मनिरपेक्षता नष्ट करू इच्छितात आणि देशाला इस्लामी बनवू इच्छितात; परंतु गेल्या दीड वर्षांत त्यांना पद्धतशीरपणे मुख्य प्रवाहात आणले गेले आहे. या पृष्ठभूमीवर 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या विश्लेषणाचा अर्थ लावला, तर बांगलादेश-अमेरिकेचे वाढते संबंध भारतासाठी अडचणीचे ठरू शकतात, हे लक्षात येईल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# चिंतनाला कृतीची जोड देणारे तत्त्वज्ञ

अध्यात्माची विज्ञानाशी सांगड घालून या आधुनिक युगात मानव कल्याणासाठी झटणारे तत्त्वज्ञ आणि भारतीय संस्कृतीला आपल्या ध्येयाची जोड देऊन सदैव मार्गक्रमण करणारे प्रा. विश्वनाथ दा. कराड यांचा आज जन्मदिवस. प्रा. विश्वनाथ कराड आज वयाची ८५ वर्षे पूर्ण झाल्यावर ध्येय प्राप्तीसाठी त्यांची धडपड वाखाणण्यासारखी आहे. त्यांचा जन्म गाव खेड्यामधला. मराठवाड्यामधील रामेश्वर रुई हे त्यांचे जन्मगाव. प्राथमिक शिक्षण गावामध्येच झालेले. त्यानंतर माढा आणि सोलापूर अशी त्यांची शिक्षण यात्रा. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयामधून ते इंजिनीयर झाले आणि तिथेच प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांच्या कुटुंबावर वारकरी संप्रदायाचा पगडा. या संस्कारांमध्येच ते लहानाचे मोठे झाले. अध्यात्माची ओढ त्यामुळेच त्यांच्या हृदयात कायमची कोरली गेली. अध्यात्माची ही ओढ आणि अथक परिश्रम यामुळे प्रा. कराड यशाचे खरे मानकरी ठरले. संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री तुकाराम महाराज आणि स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि प्रेरणा यामधून त्यांना बळ प्राप्त झाले. या महापुरुषांच्या मानवी कल्याणाची शिकवण त्यांनी आपल्या आयुष्यात कायमची रुजविली आणि



एमआयटी म्हणजेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टॅक्नॉलाजी या संस्थेत मुल्याधिष्ठित वैश्विक शिक्षणाची संकल्पना रुजविली गेली. उच्च तांत्रिक शिक्षण विना-अनुदानित करून विद्यार्थ्यांना अधिक सोयी आणि संधी उपलब्ध करून द्याव्या, गोरगरिब आणि गावखेड्यामधील विद्यार्थ्यांनी पुढे यावे, या उद्देशाने त्यांनी १९८१ मध्ये म्हणजे ४० वर्षांपूर्वी एमआयटी या इंजिनीअरीग कॉलेजची स्थापना केली. त्यानंतर या संस्थेचा विस्तार होत आज ही संस्था देशातच नव्हे, तर विदेशातही कीर्तीमान स्थापन करीत आहे. आपल्या उभ्या आयुष्यात प्रा. विश्वनाथ कराड यांनी अध्यात्म, समाजप्रबोधन, शिक्षण आणि अन्य क्षेत्रांमध्ये समाजभिमुख अनेक उपक्रम निष्ठेने साकारले. त्यांच्या हातून घडलेले अनेक अलौकीक कार्य तसेच स्वामी विवेकानंद यांनी प्रतिपादीत केलेल्या 'विज्ञान व अध्यात्म्याच्या माध्यमातून जगात शांती नांदेल' या वचनावर आधारीत अनेक भव्य वास्तूंनी मूर्तरूप घेतले. आपल्या ४० वर्षांच्या अथक परिश्रमाच्या कालावधीत प्रा. कराड अनेक महनियांच्या संपर्कात आले. त्यात माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम, माजी पंतप्रधान चंद्रशेखर, व्यंकय्या नायडू, डॉ. रघुनाथ माशेलकर आदी अनेकांचा समावेश आहे. प्रा. कराड यांची शिक्षण पद्धतीला नवे वळन देण्याची धडपड, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशाभिमान, आपले संस्कार आणि संस्कृती, भारतीय तत्त्वज्ञानाबाबत जागृती निर्माण करणे आदी कार्यांची दखल घेत अनेक महनीय व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे. प्रा. कराड यांनी अध्यात्म, विज्ञान, शिक्षण आणि विश्व शांतीच्या प्रतिक अशा अलौकीक वास्तूंची निर्मितीही केली आहे. त्यात श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्वरूप दर्शन मंच, वारकरी समाजाचे भक्ती, प्रेम व करुणाचे प्रतिक असलेला १४५ फूट उंचीचा सुवर्णजडीत गरुडस्तंभ, रामेश्वर रुई येथील श्री राम रहिम मानवता सेतू, भगवान गौतम बुद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वशांती भवन, लोणी काळभोर येथे प्रेम आणि मानवतेचा संदेश देणारे श्रीमद् भागवत गीता ज्ञान भवन, ९ घुमट असलेली विश्वशांती संगीत कला अकादमी, विश्वरूप देवता दर्शन मंदिर, संत श्री ज्ञानेवर माउली आणि संत श्री तुकाराम महाराज विश्वशांती प्रार्थना सभागृह व ग्रंथालयाची निर्मिती करून त्यांनी शिक्षणाप्रती तसेच विश्वशांतीसाठी केलेले प्रयत्न अजोड आहेत. जगात स्थर्य आणि शांतता नांदावी आणि 'हे विश्वची माझे घर' या संकल्पनेला प्रत्यक्षात साकारण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्यास तोड नाही. भारतीय सनातन संस्कृतीची ही शिकवण प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी रुजावी, सर्वश्रेष्ठ विद्यार्थी देशातच तयार व्हावे, यासाठी त्यांची निष्ठा आणि तळमळ, नवीन भारताच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेले योगदान शाश्वत परंपरेला साजेसे आहे. आपली परंपरा आणि संस्कृतीवर असलेल्या दृढ विश्वासाने, अनेक विपरीत परिस्थितीवर मात करून त्यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले आहे. आज त्यांच्या जन्मदिनी श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेडच्या वतीने त्यांना शुभेच्छा देत आपण सर्व देशाच्या आणि विश्वाच्या कल्याणासाठी दृढ सकल्प करू या!

९८८१७१७८५६

---

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# इलेक्ट्रॉनिक उद्योगाचे आशादायी भविष्य

भारतातील इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या या विशेष प्रगती आणि विकासाला पाठबळ लाभले, ते कारखाने-उद्योग, वाहन-उद्योग, संशोधन क्षेत्र व घरगुती उपकरणांचा वापर या विविध क्षेत्रांतील वाढत्या इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि उपकरणांच्या वापराचे. गेल्या काही वर्षांतील भारताच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांना असणारी विदेशातील मागणीदेखील वाढत असल्यानेच या उद्योगाचा व्याप आणि व्यवसाय वाढत आहे.

भारतीय इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या वाढीसाठी उपयुक्त ठरलेला प्रमुख व धोरणात्मक निर्णय म्हणून २०१९च्या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक धोरणाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. याच धोरणाच्या अंमलबजावणीसह वाढत्या व्यवसायाला गती मिळाली, ती मोबाईल फोन, टेलिव्हिजन, संगणकीय व संवादविषयक उपकरणे व सुटे भाग, संरक्षण, वाहतूक-रेल्वे व दळणवळण इ. क्षेत्रांतील वाढणाऱ्या इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाच्या वापराची. यातूनच मध्यम व लघु उद्योगांपासून सरकारी व खाजगी क्षेत्रातील व्यापक उद्योगांचा विस्तार होत गेला.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने धोरणात्मक स्वरूपात राष्ट्रीय स्तरावर इलेक्ट्रॉनिक धोरण जाहीर करण्यापूर्वी या व्यवसाय क्षेत्रात परंपरागत स्वरूपात व्यवसाय पद्धती प्रचलित होती. यामध्ये प्रामुख्याने घरगुती वापराची उपकरणे, टेलिव्हिजन संच, संगणक व सुटे भाग इ.चा समावेश असायचा. मात्र, सरकारने वर नमूद केल्याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक धोरण जाहीर केल्यावर इलेक्ट्रॉनिक व्यवसाय क्षेत्रातील सारेच चित्र बदलले. यातून प्रगत संशोधनाची जोड मिळून इलेक्ट्रॉनिक क्षेत्राने ५ जीपर्यंतचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला, तो त्यानंतरच. इलेक्ट्रॉनिक धोरणाची यशस्वी व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय स्तरावर वेळोवेळी जी उपाययोजना करण्यात आली, त्यामध्ये पुढील टप्पे विशेष महत्त्वाचे ठरले :

**इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टरिंग योजना** : या योजनेअंतर्गत विशेषतः लहान व मध्यम स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक उद्योग व उद्योजकांसाठी क्लस्टर स्वरूपातून विशेष उत्पादन केंद्रांची स्थापना करण्यात आली. यातून सुमारे ५४ हजार कोटी रुपयांची लघु व मध्यम इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात नव्याने गुंतवणूक होऊन त्याद्वारे २.६९ लाख नवे रोजगार उपलब्ध झाले.



**इलेक्ट्रॉनिक डेव्हलपमेंट फंड** : इलेक्ट्रॉनिक उत्पादन व व्यवसाय क्षेत्रात नवे तंत्रज्ञान-संशोधन व विकसित उत्पादन पद्धतीला चालना देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली. या निधीच्या माध्यमातून १२८ स्टार्टअप सुरू झाले व त्यातून सुमारे २२ हजार नवे रोजगार उपलब्ध होऊ शकले.

**उत्पादन प्रोत्साहन राशी योजना** : केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेअंतर्गत उपलब्ध असणाऱ्या राशी वितरण योजनेअंतर्गत इलेक्ट्रॉनिक क्षेत्राचासुद्धा समावेश करण्यात आल्याने त्याचा लाभ या क्षेत्राला अर्थातच मिळाला. यामुळे इलेक्ट्रॉनिक सुटे भाग उत्पादन करणाऱ्या, मोबाईल क्षेत्रासाठी काम करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक उत्पादकांना योजनेअंतर्गत चार ते सहा टक्के उत्पादन प्रोत्साहन राशीचा लाभ झाला आहे. याशिवाय, नजीकच्या काळात या विशेष उद्योजकांना ३.३५ लाख कोटी प्रोत्साहनपर राशी मिळणे अपेक्षित असून, त्याद्वारे सुमारे २२ हजार नवे रोजगार उपलब्ध होऊ शकतात.

याशिवाय, नव्या धोरणांतर्गत केंद्र सरकारतर्फे स्कीम फॉर प्रमोशन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रॉनिक कॉम्पोनंट्स ॲण्ड सेमीकंडक्टर्स, दि मॉडिफाईड प्रोग्रॅम फॉर डेव्हलपमेंट ऑफ सेमीकंडक्टर्स ॲण्ड डिस्प्ले मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम अथवा सेमीकंडक्टर्स इंडिया प्रोग्राम यांसारख्या योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीला पण प्राधान्यक्रमाने सुरुवात झाली आहे, हे याठिकाणी उल्लेखनीय आहे.

वरील धोरणे व त्यांच्या अंमलबजावणीचा परिणाम व त्यांचे फायदे दिसायला लागले आहेत. भारत इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात प्रामुख्याने सुट्या भागांची आयात करून त्यांची जोडणी-जुळणी करण्याचे मुख्य केंद्र म्हणून ओळखला जायचा. आता मात्र भारतात इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील प्रगत अभ्यास व संशोधनावर आधारित महत्त्वपूर्ण भाग-उपकरणांची निर्मिती तर होतेच. याशिवाय, त्यांची आता निर्यात पण व्हायला लागली आहे, हे विशेष.

यातूनच इलेक्ट्रॉनिक उद्योगांचा व्याप आणि त्यांचा आकार व संख्या यामध्येसुद्धा सातत्याने विस्तार व वाढ होत आहे. परंपरागतरीत्या लघु व मध्यम क्षेत्रातील उद्योग-व्यवसाय म्हणून प्रस्थापित झालेल्या इलेक्ट्रॉनिक उद्योगाने आता प्रस्थापित मोठ्या उद्योगाचे स्वरूप प्राप्त केले आहे. यामध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक उद्योगांसह स्टार्टअप क्षेत्राचे सहकार्य व सहभाग आता मिळू लागला आहे. वाढत्या इलेक्ट्रॉनिक व्यवसाय क्षेत्राद्वारे टप्प्याटप्प्याने व निश्चित स्वरूपात संशोधनासह वाढत्या रोजगारांना चालना मिळत आहे. याशिवाय, या व्यवसायवाढीचे सामाजिक-आर्थिक संदर्भात पण सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत, हे उल्लेखनीय आहे.उदाहरणार्थ, विविध राज्यांमध्ये विविध स्तरांवर व विविध संदर्भात इलेक्ट्रॉनिक उद्योगांना चालना व प्रोत्साहन देत योजनाबद्ध स्वरूपात जे जाळे निर्माण केले, त्याचेच हे परिणाम आहेत. यामध्ये प्रामुख्याने तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश, गुजरात यासारख्या राज्यांचा समावेश करावा लागेल. मुख्य म्हणजे, या राज्यांमधील इलेक्ट्रॉनिक उद्योगांचा व्याप आता केवळ राज्याची राजधानी वा मोठ्या औद्योगिक शहरांपर्यंतच मर्यादित राहिला नसून, त्याची व्याप्ती इतर शहरांपर्यंत वाढली आहे.अशाप्रकारे देशांतर्गत विविध स्तर आणि पातळ्यांपर्यंत पोहोचलेल्या इलेक्ट्रॉनिक व्यवसायाच्या यशस्वी यशाची नोंद व दखल आता या क्षेत्रात जागतिक पातळीवर पण घेतली जात आहे. यातून भारताच्या इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्राला आता जागतिक पातळीवर गुंतवणुकीपासून निर्यातीपर्यंत वाढता प्रतिसाद लाभत आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

### भारतमातेच्या रक्षणातील न बोलणारे शिलेदार!

यंदाच्या २६ जानेवारीला दिल्लीच्या कर्तव्यपथावर साकारलेली प्रजासत्ताक दिनाची परेड केवळ शस्त्रसज्जतेचे वा तांत्रिक सामर्थ्याचे दर्शन नव्हते; ती होती भारतभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या मूक योद्ध्यांना दिलेली जाहीर मानवंदना. हिमालयातील दुर्गम, हिमाच्छादित प्रदेशात कार्यरत असलेले उंट, रणांगणावर शिस्तबद्ध टापांवर धावणारे घोडे, तसेच दहशतवादविरोधी मोहिमांत निर्भयतेने पुढे झेपावणारे श्वान या सर्वांनी इतिहासाची आठवण करून दिली. भारताचा इतिहास उघडला, तर मूक प्राण्यांच्या शौर्यगाथा प्रत्येक पर्वात आढळतात. तानाजी मालुसरे सिंहगडाच्या कठीण कड्यावर चढताना ज्यांच्यावर विश्वास ठेवला ती घोरपड 'यशवंती'; हळदीघाटीच्या युद्धात जखमी अवस्थेतही महाराणा प्रतापांना सुरक्षित नेणारा घोडा 'चेतक'; छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकटसमयी जीवाची बाजी लावणारा घोडा 'बादल' ही नावे इतिहासात केवळ प्राण्यांची नाहीत, तर निष्ठा, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची अमर प्रतीके आहेत. ज्यांना भाषा नव्हती, पण स्वामी-निष्ठा होती...

आजच्या काळातही ही परंपरा अखंड आहे. सीमेवर तैनात श्वान स्फोटके शोधतात, घुसखोरीचा इशारा देतात आणि गरज पडल्यास शत्रूसमोर ढाल बनतात. उंच पर्वतांमध्ये उंट व खच्चर रसद पोहोचवतात, जिथे यंत्रे थकतात तिथे जिवंत शक्ती उभी राहते. घोडे परेडमधील शिस्तीइतकेच रणांगणातील धैर्याचेही प्रतीक आहेत. ही मूक सेना दिवस-रात्र, ऊन-पाऊस-हिमवृष्टीत, कोणत्याही अपेक्षेविना आपले कर्तव्य बजावत असते. म्हणूनच भारत ही केवळ भूमी नाही; ती माता आहे, म्हणूनच तिच्या रक्षणासाठी मनुष्याबरोबर मूक जीवसृष्टीही तत्पर असते. भारतीय संस्कृतीने सदैव प्राणिमात्रांमध्ये ईश्वरत्व पाहिले आहे. गाईला माता, नंदीला शंकराचे वाहन, गरुडाला विष्णूचे आसन. ही दृष्टीच आपल्या सैन्यपरंपरेत उतरली आहे. मूक योद्ध्यांना आदर, प्रशिक्षण, संरक्षण देण्यामागे केवळ उपयुक्ततेचा विचार नाही; कृतज्ञतेचा संस्कार आहे. कर्तव्यपथावर जेव्हा हे मूक शिलेदार पावलोपावली पुढे सरकले, तेव्हा त्यांच्या नजरेत अभिमान होता आणि आपल्या मनात ऋणानुबंध. ते आपल्याला आठवण करून देतात की देशभक्ती शब्दांत नव्हे, तर सेवेत असते.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## वाचक पत्रे

### भावनांच्या पलीकडचे आभासी विश्व

सध्या मोबाईल व्यक्तीच्या जीवनाचे अभिन्न अंग बनले आहे. सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत ही एकमेव अशी वस्तू आहे जी सतत व्यक्तीला चिकटून असते. एखादी वस्तू सर्वाधिक काळ व्यक्तीजवळ असल्यास ती सर्वात प्रिय बनते, मग ती सजीव असो वा निर्जीव! पण या वस्तू बऱ्याच अंशी मानवी शरीरावर व मनावर नकारात्मक प्रभाव टाकतात आणि त्यातून शारीरिक आणि मानसिक व्याधी जडतात. बऱ्याच गोष्टी माणसाला सुखावतात आणि त्यातून आंतरिक चेतन शक्ती निर्माण होऊन त्या गोष्टींचा कायम हव्यास लागतो. बरेचदा या हव्यासाचे व्यसनात रूपांतर होते. परंतु या चेतन क्रियेतून जर सकारात्मक होत असेल तर त्याचा फायदा सुद्धा होतो. उदा. नियमित पुस्तके वाचणाऱ्या व्यक्तीला जर का पुस्तकाचे व्यसन लागले तर त्याच्या बुद्धीचा विकास होईल याउलट दारूचे व्यसन लागले तर बुद्धीचा नाश. मोबाईल अथवा तंत्रज्ञानाचा वापर हा व्यक्तीच्या बुद्धीचा विकासही करतो आणि नाश सुद्धा, त्यामुळे त्याच्या वापरातील कुठल्या गोष्टी फायदेशीर आहेत आणि कुठल्या नुकसानकारक हे ओळखणे तेवढे आवश्यक आहे.

मोबाईल व्यक्तीचे अत्यंत प्रिय साधन होण्यामागे मुख्य कारण आहे तो व्यक्तीने दिलेल्या कमांडवर लगेच प्रोसेस करतो आणि उत्तर देतो. आणि अलिकडे तंत्रज्ञानात झालेले आमूलाग्र बदल ज्यात एआयचा शिरकाव यातून त्याच्याबद्दलची लोकप्रियता अधिकच बळावली आहे. म्हणून हल्ली लोक गमतीने म्हणतात सुद्धा, "एआयवर शोध भेटेल तुला!" त्यामुळे सर्व प्रश्नांची उत्तरे तिथे आहे ही खातरजमा नव्या पिढीला होत चालली आहे आणि जर का एखादे उत्तर शोधण्यास तुम्ही समर्थ आहात त्यावेळी दुसऱ्यांची आवश्यकता का? ही एकलकोंडी आणि स्वार्थीपणाची वृत्ती मानवी शरीराची मानसिक व्याधी बनते. मोबाईलवर बऱ्याच गोष्टी सहज उपलब्ध होत असल्यामुळे व्यक्तीमधील संयमी वृत्ती संपत चालली आहे. एखाद्या मनमोहक स्थळाला भेट दिल्यानंतर समोरील दृश्य स्वतःच्या डोळ्यात कायम साठवावे यातून आता ते मोबाईलच्या गॅलरीत सेव कसे होईल याची अधिक धडपड वाढत चालली आहे. यातून लक्षात येते की आभासी जगाचा व्यक्तीच्या मनावर किती मोठा प्रभाव पडत चालला आहे. व्यक्तीच्या मानसिक विकासाचा त्याच्या सर्वांगीण विकासावर प्रभाव पडतो त्यामुळे प्रत्यक्ष जीवनातील माणसे त्यांचे अनुभव ऐकणे आणि त्यांच्यातील चांगले ते घेणे आणि वाईट ते सोडून देणे असे केल्यास आंतरिक चेतन शक्तीचे संचालन योग्य दिशेला होऊन व्यक्तीचा सर्वांगीण विकास होईल.

**डॉ. दुर्गेश्वर साठवणे**/८२०८०६८८५३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम सन २०२५-२६

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनसुचनेप्रमाणे जिल्हयामध्ये राष्ट्रीय कुष्ठ निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येतो. जिल्हांतर्गत विविध योजना राबविण्यात येतात यामध्ये स्पर्श अभियान कालावधी (दिनांक २० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६), कुसुम मोहिम (कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र) कालावधी दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहेत.

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान कालावधी (दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६) ग्रामसभे मध्ये कुष्ठरोगाबाबत जनजागृती करणे दिनांक ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त कुष्ठरोग निवारण दिन साजरा करणे व दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये विविध आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

घोषवाक्य भेदभाव समाप्त करुया सन्मानाची वागणुक देऊया. Ending Discrimination, Ensuring Dignity कुसुम मोहिम (कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र) कालावधी दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी

उबदेश -१. नियमित सर्व्हेक्षणामध्ये कुष्ठरोगाच्या तपासणीपासून वंचित राहीलेल्या घटकांचे सर्व्हेक्षण करणे.

२. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करुन होणारा प्रसार कमी करणे.

३. सदर घटकांमध्ये विविध प्रसार/प्रचार माध्यमाद्वारे जनजागृती करुन प्रबोधन करणे.

४. सन २०२७ पर्यंत जुन्य कुष्टरोग प्रसाराचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे.

५. अतिजोखमीच्या ठिकाणांचे सर्व्हेक्षण करणे, मोहिमेबाबत विस्तृत प्रसिध्दी करुन जनजागृती करणे.

६. जिल्हयातील जोखमीची ठिकाणे शोधणे, मनुष्यबळाची माहिति घेवून त्यानुसार कृतीआराखडा बनविणे.

जिल्हयामध्ये एकुण २८८३६ लोकसंख्या अतिजोखमिच्या भागातील लोकसंख्या निवडण्यात आलेली आहे. यामध्ये उसतोड कामगार, खडीक्रशर कामगार, आश्रमशाळा विद्यार्थी, हॉस्टेल विद्यार्थी, तुरुंग कैदी, विटभटटी कामगार, भटकंती करणारे लोक, रोड कन्स्ट्रक्शन साईट वरिल कामगार ईत्यादी कामगारांचे आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत सर्व्हेक्षण करुन कुष्ठरोग जनजागृती करण्यांत येणार आहे.

जिल्हयाची प्रगतीपर माहिती माहे डिसेंबर २०२५ अखेर

माहे डिसेंबर २०२५ अखेर एकुण २१० नविन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले यामध्ये (११७ पीबी व ९३ एमबी रुग्ण). उपचाराखाली १९८ रुग्ण आहेत व एकुण १७१ रुग्ण हे कुष्ठरोग मुक्त झालेले आहेत. यामध्ये २ बालरुग्ण आढळुन आले आहेत (पीबी), एकुण पात्र पीईपी सहवासीत ५३२१ असुन त्यापैकी ५२४६ सहवासितांना पीईपी देण्यात आले (९९ टक्के).

जिल्हयामध्ये आरसीएस चे ६ रुग्णांचे उददीष्ट असुन त्यापैकी २५ रुग्णांचे आरसीएस शस्त्रक्रिया वडाळा येथे करण्यात आली.कुष्ठरोग इतर आजाराप्रमाणेच पूर्णपणे बरा होणारा आजार

आजाराबाबत समज-गैरसमज व कारणे कुष्ठरोग एक आजार असुन रगतपिती, महारोग, बडीबिमारी अशा कितीतरी नावाने ओळखला जातो. या आजाराकडे दुर्लक्ष केल्यावर हातापायाची बोटे झडणे, जखमा होऊन त्या दुरुस्त होत नसल्याने हातपाय थोटे होणे, डोळयाची पापणी न लागणे, डोळे आंधळे होणे, नाकाचे हाड मध्येच दबल्यामुळे नाक बसणे इत्यादीमुळे माणुस कुरुप होतो/ दिसतो. जखमा ब-या होत नाहीत. यामुळे समाजात अशा व्यक्तीकडे इतर लोक, कुटुंबातील लोकासह नातेवाईक यांचेकडुन अत्यंत घृणायुक्त नजरेने पाहिले जाते. किंबहुना अशा कुरुप विकृती आलेल्या कुष्ठरुग्णांस वाळीत टाकले जाते. दुर्लक्ष केले जाते. त्यांच्याकडे कोणी आपुलकीने प्रेमाने पाहत नाहीत. त्याचे कांहीही करत नाहीत. त्यामुळे शेवटी अशा रुग्णांना मंदीरासमोर, यात्रेत बसुन भीक मागणे, गाव सोडणे यासारखया समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु हे सर्व होण्याच्या अगोदर, आजार कमी असतानाच लवकरात लवकर शासनाकडील मोफत उपचार (सहा ते बारा महिने) घेऊन बरील सर्व गोष्टी टाळता येतात.

कुष्ठरोग होण्याचे कारणेः कुष्ठरोग हा इतर आजारा सारखाच उपचार घेतल्यावर पुर्णपणे बरा होणार आजार आहे. हा आजार मायकोबॅक्टरियम लेप्री नावाच्या कुष्ठजंतु जिवाणुमूळे होतो. या कुष्ठजंतुचा नोध डॉ. एच.ए. हॅनसन यांनी इ.स. १८७३ मध्ये लावला.

कुष्ठरोगाची लक्षणे काय आहेत या आजाराची लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

२) कानाच्या पाळया कांहीशा जाडसर, गाठी आल्यासारख्या होतात.

१) लाल पांढरट थोडासा तेलकट बधीर चट्टा प्रमुख लक्षण असुन इतर लक्षणे खालीलप्रमाणे.

३) चट्टयाच्या ठिकाणी त्वचेवर केस रहात नाहीत. चट्टयाच्या ठिकाणी किंचीत त्वचा वर उचलल्यासारखी दिसते. चट्टयावर घाम येत नाही.

४) हातापायाला मुंग्या येतात.

५) हातापायाच्या जखमा दुरुस्त होत नाहीत.

६) मज्जतंतु (नर्व्ह) जाडसर होतात. कांहीशा दुखतातसुध्या.

प्रमुख बाधा पोहंचणारे शरिराचे अवयव कोणते -१) त्वचा २) मज्जातंतू

कुष्ठरोगाचे प्रकार किती आहेत २

१) सांसर्गीक कुष्ठरोग (एमबी) ५ पेक्षाजास्त बधीर चट्टे व एक मज्जतंतु, १ किंवा १ पेक्षा जास्त

२) असांसर्गीक कुष्ठरोग (पी.बी) ५पेक्षा कमी बधीर चट्टे.

कुष्ठरोगाचे प्रसाराचे माध्यम कोणते हा आजार हवेतून पसरतो. प्रमुख घटक / बाबी.

१) औषधापचार न घेणारा सांसर्गीक रुग्ण (एम.बी.)

२) सांसर्गीक रुग्णाचे खोकलणे व शिंगणे, यामुळे जंतू हवेत पसरतात.


३) श्वासोच्छवासातुन निरोगी व्यक्तीसच्या शरिरात जंतुचा प्रवेश

४) अत्यंत कमी रोगप्रतिकार शक्ती असलेल्या व्यक्तीत लक्षणे दिसतात.

लक्षणे दिसण्यासाठी जंतूचा अधिशयन काळ-किमान ३ वर्ष व कमाल ३० वर्षापर्यंत असतो.

# चित्रकला स्पर्धेला हजारो बालकलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

अनिल दादा जगताप फाउंडेशन बीड व शिवसेना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक २०२६ अंतर्गत पहिलीच चित्रकला स्पर्धा प्रचंड उत्साहात व बालकलाकारांच्या भरगच्च सहभागात पार पडली. या चित्रकला स्पर्धेत बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई, केज, वडवणी, आष्टी, पाटोदा व बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील गावखेड्यांमधून मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या तब्बल १८७ शाळांमधील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा एवढा मोठा सहभाग हे चंपावती महोत्सवाचे यश अधोरेखित करणारे ठरले.

वयोगट इयत्ता पहिली ते तिसरी छोटा भीम या कार्टूनचे चित्र, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी घोडा या प्राण्याचे चित्र, वयोगट इयत्ता सातवी ते दहावी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे चित्र विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकता, रंगसंगती आणि कलात्मकतेचा सुरेख संगम साधत आपापल्या चित्रांमधून अनोखा चित्रकलाविष्कार सादर केला. विशेषतः सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या स्व बाळासाहेब ठाकरे यांच्या चित्रांमध्ये जिवंतपणा व भावभावना दिसून आल्या. तर लहान गटातील विद्यार्थ्यांनी छोटा भीम आणि घोडा या चित्रांमधून आपल्या कल्पनाशक्तीचा सुंदर आविष्कार घडवला.

सलग चौथ्या वर्षी सुरू असलेल्या चंपावती महोत्सवातील पहिल्याच स्पर्धेला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षवेधी ठरला आहे. यानिमित्ताने शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी सर्व शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांचे आभार मानत बालकलाकारांचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. कालपासून खऱ्या अर्थाने चंपावती महोत्सवाचा प्रारंभ झाला असून, चित्रकला स्पर्धेनंतर दि. ३ फेब्रुवारी रोजी प्रत्येक शाळेत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अनिल दादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैया जगताप व चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले आहे. बालकलाकारांना व्यासपीठ देणारा, ग्रामीण भागातील कला पुढे आणणारा आणि संपूर्ण बीड जिल्ह्याच्या सांस्कृतिक चळवळीचा मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव पुन्हा एकदा जिल्ह्यातील कला, संस्कार आणि सर्जनशीलतेचे केंद्रबिंदू ठरत असल्याचे या स्पर्धेतून स्पष्ट झाले आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे चित्रांतून जिवंत झाले!

चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महा करंडकातील पहिल्याच चित्रकला स्पर्धेतील सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची चित्रे रेखाटताना विलक्षण कौशल्य दाखवले. विद्यार्थ्यांच्या रेषा, रंगसंगती आणि भावभावना यामुळे बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व चित्रांतून जिवंत झाल्याचा अनुभव उपस्थितांना आला. डोळ्यांतील करारी भाव, चेहऱ्यावरील आत्मविश्वास आणि नेत्रदीपक सादरीकरणाने ही चित्रे लक्षवेधी ठरली. बालवयातच बाळासाहेबांच्या विचारांशी असलेली नाळ या चित्रांतून प्रकर्षाने दिसून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी सर्व बालकलाकारांचे विशेष कौतुक केले.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा उत्साहात निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि. ३१ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर होत्या. यावेळी उपप्राचार्य सय्यद सिद्धीक यांच्यासह शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. यावेळी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्येष्ठ विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण उत्साहपूर्ण केले.

प्राचार्या उमा जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीची परीक्षा हा केवळ एक टप्पा असून जीवनात मोठी ध्येये निश्चित करा. संकटांना धैर्याने सामोरे जात शाळेचे नाव उज्ज्वल करा. यावेळी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना परीक्षेचा तणाव दूर ठेवून वेळेचे योग्य नियोजन करण्याचे मार्गदर्शन केले.

निरोप समारंभाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेत टाकलेल्या पहिल्या पावलापासून शिक्षकांचे प्रेमळ मार्गदर्शन आणि मित्र-मैत्रिणींसोबत डबा शेअर करत घालवलेल्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला मुंडे यांनी केले, तर आभार वर्षा जावळे यांनी मानले.

# सोमेश्वर मंदिर येथे आज श्री रामायणातील अरण्यवाचक कांड्याची महाप्रसादाने मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**



बीड येथील सर्वच्या नवसाला पावणारे बार्शी रोडवरील श्री.सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या रामायणातील अरण्य कांडातील महाप्रसाधने मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये सांगता या वेळी बीड शहरातील व पंचक्रोशीतील श्रीराम भक्त हनुमान भक्त सोमेश्वर महादेव भक्त इत्यादी यांनी शेकडोच्या संख्येने उपस्थिती लावून या कार्यक्रमाची शोभा वाढवले व सर्वांनी महाप्रसाद घेतला व कथा श्रवण केली प्रभू रामचंद्र सारखे जीवन सर्वांनी जगायला पाहिजे व प्रभू रामचंद्र यांचा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवून पुढे चालायला पाहिजे अशी चर्चाही यावेळी येथे भाविक भक्तांनी केली व महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता संपन्न झाली या वेळी सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे प्रदेश उपाध्यक्ष तथा भाजपा नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या शुभहस्ते आरती संपन्न झाली यावेळी नागोराव काकडे प्रधान पवार पांडुरंग मामा जानवळे पत्रकार संजय देवा कुलकर्णी ज्ञानेश्वर बाबासाहेब शिंदे एडवोकेट धनंजय दबडे प्रवीण चव्हाण हजारे मामा भागवत वैद्य आत्माराम वळकर राजेश अडागळे सुरवसे साहेब गणेश गरड बाबासाहेब शिंदे अलकाबाई डावकर गरड मॅडम गव्हाणे मामा आणि वाचक सूचक रामायण प्रेमी इत्यादींनी यावेळी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवून महाप्रसादाने या रामायण वाचण्याची सांगता संपन्न झाली असे संस्थेच्या वतीने प्रसिद्धी माध्यमाद्वारे कळवलेले आहे यावेळी नगरसेवक गोविंद नवनाथ शिराळे हनुमंत गायकवाड इत्यादींनी आभार व्यक्त केले मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला

# पूर्णवादी बँकेस टॉप १०० CXO परिषदेत पुरस्कार तसेच बँकेचे CEO यांना सर्वोत्कृष्ट उएज पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

दि. ३० व ३१ जानेवारी २०२६ रोजी खोपोली येथे टॉप १०० CXO परिषद पार पडली. या परिषदेत पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेस ग्राहकांची होणारी ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी केलेल्या नवनवीन उपाययोजनांबद्दल 'Leading Tech Innovation In Fraud Prevention' या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार बँकेच्या वतीने बँकेचे उएज श्री राजेश कुलकर्णी व माहिती तंत्रज्ञान विभागातील श्री अक्षय देशमुख यांनी स्वीकारला. तसेच याच परिषदेत पूर्णवादी बँकेचे CEO श्री राजेश कुलकर्णी यांना Digital Initiative Technology Adoption साठी सर्वोत्कृष्ट उएज पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेस प्राप्त झालेल्या पुरस्कारांमध्ये बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी, उपाध्यक्ष डॉ.लक्ष्मीकांत पारनेरकर तसेच सर्व संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन व सर्व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाचा मोलाचा वाटा आहे असे प्रतिपादन श्री राजेश कुलकर्णी यांनी केले. सदर पुरस्कारांबद्दल बँकेच्या ग्राहक,




सभासदांतर्फे तसेच समाजातील सर्व स्तरातून बँकेचे व बँकेचे CEO श्री राजेश कुलकर्णी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड येथे टोयोटा किर्लोस्कर कंम्पनी मधील टिमकडूनTotota culture Implimetation, हा प्रेरणादायी उपक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

टोयोटा किर्लोस्कर कंपनीच्या टिमने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड येथे १० दिवस उपस्थित राहून Toyota culture Implementation, या योजने अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड येथील प्रशिक्षणार्थी मुल-मुलींकरिता विविध उपक्रम राबवले. या उपक्रमांद्वारे प्रशिक्षणार्थीना शिस्त, सुरक्षितता, फाईव्ह-एस (५ड) पद्धती, शारीरिक तंदुरुस्ती अनेक व्यायाम तसेच व्यावसायिक कौशल्यांबाबत प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले.

टोयोटा किर्लोस्कर टिममध्ये चिदानंद सर, रवी सर व मधुसर यांचा समावेश असून, त्यांनी गेल्या १० दिवसांत प्रशिक्षणार्थीशी थेट संवाद साधत प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले. या उपक्रमात प्रशिक्षणार्थी व टोयोटा किर्लोस्कर टिम यांच्यात योग्य समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेचे प्राचार्य डॉ. उखळीकर पी.डी. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

या वेळी श्री. बारगजे सर, रामदासी सर, सगळे सर,धस सर, जगताप सर, बेलेकर सर, कळसकर सर, मुळे सर, पठाण सर, वैष्णव सर, मोरे सर, तोटे सर, जोगदंड सर, पवार मॅडम, मांजरे मॅडम, लोंढे सर आदी सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने सक्रिय सहभाग घेतला.या उपक्रमांमुळे प्रशिक्षणार्थीमध्ये शिस्तबद्ध कामकाज, सुरक्षिततेची जाणीव व सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण झाली असून, मिळालेले मार्गदर्शन दैनंदिन प्रशिक्षणात व भविष्यातील औद्योगिक जीवनात निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.टोयोटा टिमने दिलेल्या मौल्यवान वेळेबद्दल व मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. तसेच हा उपक्रम यापुढेही संस्थेमध्ये सातत्याने राबवून एक आदर्श निर्माण करण्यात येईल, असे मत प्राचार्य डॉ. उखळीकर पी.डी. यांनी व्यक्त केले.

# पायाभूत सोयी-सुविधा अनुदान योजनेसाठी मुदतीत प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

बीड जिल्हयातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौध्द समाजातील विश्वस्त / सदस्यांची संख्या असलेल्या बौध्द समाजातील सांस्कृतीक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२५-२६ राबविणे. अंतर्गत

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.०७.१०.२०२४ अन्वये राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौध्द समाजातील विश्वस्त / सदस्यांची संख्या असलेल्या बौध्द समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.ज्या संस्थांना या योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करावयाचे आहेत त्यांनी अल्पसंख्याक विकास विभागाच्या दिनांक ०७.१०.२०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे विहित नमुण्यात रितसर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक २० फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी असे जिल्हा नियोजनचे अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांनी कळविले आहे.

# शासकीय कार्यालयात दुचाकी चालक अधिकारी व कर्मचारी यांनी हेल्मेट परिधान करणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. याबाबत वेळोवेळी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेट सक्तीचे आहे असे निर्णय देण्यात आलेले आहेत.

हेल्मेट वापरण्याबाबत याआधीही सुचित करण्यात आले होते पण हेल्मेटचा वापर झाल्याचे दिसुन येत नाही.बीड जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद येथे काम करणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना तसेच सार्वजनिक रस्त्यावर दुचाकी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करण्यात यावा व जिल्हा रस्ता सुरक्षा समितीस बीड जिल्हा अपघात मुक्त करण्यास मदत करावी. उपरोक्त बाब आपल्या अधिनस्त सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व दुचाकी वाहन चालविणा-या अधिकारी / कर्मचा-यांवर सर्व विभाग प्रमुख यांनी व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवण्यात यावे व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या छत्रपती चौकात सिग्नलची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** सततच्या वाहतूक कोंडीमुळे लातूर - औसा रस्त्यावरील छत्रपती चौकात सिग्नल सुविधा सुरु करण्यात यावी, अशी मागणी वाढीस लागली आहे.

लातूरचा वाहतूक कोंडीचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. शहरात असा कोणताही रस्ता नाही, ज्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होत नाही. शहरातील अंतर्गत रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. आता त्यासोबतच शहरालगत असणाऱ्या लातूर - औसा रोडवरील बार्शी, नांदेडच्या वळण रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होताना दिसत आहे. शहरातील राजीव गांधी चौकातही वाहतूक कोंडी होते. त्याबरोबरच राजीव गांधी चौक ओलांडून औशाकडे जाणाऱ्या रोडवरील छत्रपती चौकातही आता मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. एकदा का छत्रपती चौकात वाहतुकीची कोंडी झाली की त्यामुळे कधी कधी थेट राजीव गांधी चौकापर्यंत वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर नेहमीच प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे राजीव गांधी चौकासह आता त्यापुढील छत्रपती चौकातही नव्याने सिग्नल उभारण्यात यावेत, अशी मागणी वाढली आहे. सिग्नल सुविधा नसल्याने वाहतूक कधी कधी या ठिकाणी शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस कर्मचारी वाहतूक नियंत्रण करताना दिसतात. तरीही या चौकात सिग्नलची उभारणी केली गेल्यास वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.



# लातूरची गंज गोलाई पुन्हा एकदा अतिक्रमणाच्या विळख्यात !

## 'अतिक्रमण हटाव'चा फार्स संपणार तरी केव्हा ?
## अर्ध्याहून अधिक रस्त्यावर हातगाड्यांच्या रांगा
## वाहनधारकांसह पादचाऱ्यांचीही होतेय अडचण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** नवी दिल्लीच्या कॅनॉट प्लेसची प्रतिकृती समजल्या जाणाऱ्या लातूरच्या ऐतिहासिक गंज गोलाईला पडलेला अतिक्रमणाचा विळखा अद्यापही सुटू शकलेला नाही. नागरिकांकडून ओरड होताच काही काळासाठी अतिक्रमण हटविण्याचा फार्स केला जातो. पुन्हा काही दिवसानंतर अतिक्रमण ' जैसे थे' होत असल्याचा सामान्य लातूरकरांचा जुना अनुभव झाला आहे. या वाढत्या अतिक्रमणामुळे वाहनधारक, पादचारी ,व्यापारी या सर्वांचीच मोठी गोची होत असलेली पाहावयास मिळत आहे.

लातूरच्या ऐतिहासिक गंज गोलाईने नुकतेच शतक पूर्ण केले आहे. उत्कृष्ट वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेल्या गंज गोलाईला सभोवतीच्या अतिक्रमणाने पुरते वेढून टाकले आहे. त्यामुळे गंज गोलाईचे सौंदर्य आणि महती दोन्ही बाबी जणू दुर्लक्षित होताना दिसत आहेत. शहराच्या विविध १२ -१३ मार्गांनी गोलाईमध्ये प्रवेश करता येतो. या सगळ्याच मार्गांना मागच्या प्रदीर्घ काळापासून अतिक्रमणाचा मोठा विळखा पडल्याचे दिसून येते. गोलाईतून मस्जिद रोड जाणारा रस्ता तर कायम हाटगाड्यानी वेढलेला आढळून येतो. या रस्त्याने एखाद दुसरी चार चाकी घेऊन जाणे सुद्धा जिकिरीचे झाल्याचे जाणवते. गंज




गोलाईची चहूबाजूने कमी अधिक प्रमाणात सगळीकडे हे अतिक्रमण झाल्याचे पाहायला मिळते. मुख्य रस्त्याने गंज गोलाईकडे येताना सुद्धा रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी हातगाड्यांच्या रांगा पाहायला मिळतात. शहरात वाहतुकीची कोंडी होण्यामागे या अतिक्रमणाचाही मोठा वाटा आहे, ही बाब दुर्लक्षून चालणार नाही. अर्ध्याहून अधिक रस्त्यावर हातगाड्यांच्या रांगा पाहायला मिळतात. त्यामुळे वाहनधारकांसह पादचाऱ्यांचीही मोठी अडचण होताना दिसते.

लातूरची मुख्य बाजारपेठ म्हणूनही गंज गोलाईकडे पाहिले जाते. मात्र, ही मुख्य बाजारपेठच वर्षानुवर्षे कायम अतिक्रमणाच्या विळख्यात राहत आली आहे. मनपा प्रशासनाकडून अधून मधून हे अतिक्रमण काढण्याचा फार्स केला जातो. काढण्यात आलेले अतिक्रमण अवघ्या काही दिवसातच नव्हे तर काही तासात पूर्ववत झाल्याची उदाहरणे अनेकदा पाहायला मिळाली आहेत. त्यामुळे स्थानिक प्रशासनालाच हे अतिक्रमण कायमस्वरूपी काढायचे नाही की काय ? असा प्रश्नही आता सुजाण नागरिकांना पडताना दिसतोय. केवळ हातगाडेच नाही तर रस्त्यालगतच्या पार्किंगच्या जागेत दैनंदिन गरजेच्या वस्तू विकणारी मंडळीही आपल्या पथारी पसरून व्यापार करताना आढळतात. अशा छोट्या छोट्या विक्रेत्यांमुळे बाजारात दुचाकी घेऊन आलेल्या ग्राहकांनाही वाहन लावायला जागा उपलब्ध होत नाही. दुचाकी धारकांची ही अवस्था असेल तर चार चाकी वाहनधारकांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाही न केलेली बरी.

गंज गोलाईतील अतिक्रमण कायमसाठी काढण्यासाठी मनपा प्रशासनाने आता त्यावर उपाय योजना राबविणे आवश्यक झाले आहे. रस्त्यावर इकडे तिकडे व्यवसाय करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांना, हातगाडेवाल्यांना व्यवसायासाठी जागा निश्रि्चत करून देणे गरजेचे आहे. सध्याच्या अतिक्रमण करणाऱ्यांकडून मनपाचेच काही कर्मचारी चक्क बेकायदा पैसे वसूल करून ते स्वतःच्या खिशात घालत असल्याच्या तक्रारीही आहेत. अतिक्रमण काढल्याने शहराच्या सौंदर्यात वाढ तर होणार आहेच, त्याशिवाय शहरातील वाहतुकीची कोंडीही त्यामुळे कमी होण्यास मदत होणार आहे. आता मनपाच्या निवडणुकाही पार पडल्या आहेत. मनपा पदाधिकारी - मनपा प्रशासन आणि पोलीस प्रशासन या सर्वांनी एकत्रित येऊन लातूरच्या गंज गोलाईला अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करावे,अशी मागणी पुन्हा एकदा वाढीस लागली आहे.

## विविध वृत्त...

### माऊली नगरातून मोबाइलची चोरी

**लातूर :** शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोबाइल चोरीची घटना उघडकीस आली आहे. माउलीनगर, बार्शी रोड परिसरातून एका मजुराचा मोबाइल अज्ञात चोरट्याने लंपास केला. फिर्यादी प्रदीप देवगीर भुसे (वय २५, रा. माउलीनगर) हे १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:३०च्या सुमारास परिसरात असताना, त्यांच्या खिशातील ६,००० रुपये किमतीचा मोबाइल अज्ञात चोरट्याने अत्यंत शिताफीने चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार धुमाळ करत आहेत.

### आनंद मेळा प्रवेश शुल्क रद्द करावा

**लातूर :** लातूरचे ग्राम दैवत श्री सिद्धेश्ववर व रत्नेश्वर यात्रेतील आनंद मेळाच्या आकारण्यात येणारे शुल्क रद्द करण्यात यावा, अशी मागणी लातूर शहर पूर्व भाग कृती समितीच्या वतीने माजी मंत्री आ. अमित देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, देवस्थान ट्रस्टचे प्रशासक सचिन जांबुतराव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बसनसोडे, विश्र्वास कुलकर्णी, शंकर जाधव, भागवेश्र्वर धनगर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पथदिवे दुरूस्ती गुत्तेदाराच्या प्रतीक्षेत

**लातूर :** मागील तीन वर्षांपासून देखभाल-दुरुस्तीअभावी रामभरोसे सुरू असलेले शहरातील पथदिवे एक-एक करुन बंद पडत आहेत. त्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठी राज्य सरकारने नवा गुत्तेदार शोधला आहे. परंतु, मध्येच लागलेल्या महापालिका निवडणूक आचारसंहितेमुळे त्या गुत्तेदारासोबत करावयाचा करार अद्यापही झाला नाही. त्यामुळे शहरातील पथदिवे बंद असलेल्या भागात अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

### कारच्या धडकेत महिला जखमी

**लातूर :** लातूर ते औसा महामार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कारने दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या फिर्यादीच्या आई गंभीर जखमी झाल्या. २६ जानेवारी रोजी दुपारी १:३० च्या सुमारास ही घटना घडली. २६ वर्षीय तरुण अभियंता आपल्या आईला घेऊन दुचाकीवरून जात असताना कार (एमएच २४ - सीडी २२०४) चालक ओमप्रसाद मनोहरराव कचरे याने निष्काळजीपणे गाडी चालवून दुचाकीला धडक दिली. फिर्यादीच्या आईच्या डोक्याला आणि कंबरेला गंभीर दुखापत झाली. लातूर ग्रामीण पोलिसात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

### दुचाकी लंपास; गुन्हा दाखल

**लातूर :**तालुक्यातील करजगाव येथील एका ज्येष्ठ नागरिकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी तुकाराम ईराप्पा दळवी (वय ७१, रा. करजगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्रमांक एमए. २५, एबी. ५८५५), जिची अंदाजे किंमत ३०,००० रुपये आहे, ती अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना ३१ जानेवारी रोजी सकाळी १०:३० ते १ फेब्रुवारी दुपारी २:३५ च्या दरम्यान घडली.

### दोन दिवस मद्यविक्री बंद

**लातूर :** जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समितीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान व ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदानापूर्वी व मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील सर्व मद्य दुकाने बंद राहणार आहेत.

### खड्डेमय रस्त्यांमुळे वाहनधारक त्रस्त

**लातूर :** शहरातील जुन्या रेल्वेलाईनच्या समांतर रस्त्यावर पडलेले खड्डे वाहनधारकांसाठी डोकेदुखी बनले आहेत. रस्ता दुरुस्तीसाठी वारंवार मागणी करून महापालिका प्रशासन लक्ष देत नसल्याची ओरड वाहनधारकांतून वाढली आहे. या मार्गावरील वाहतूक मुख्य मार्गाने होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते पाच नंबर चौकापर्यंतचा मार्ग अतिशय खडतर झाला आहे. खड्डे वाढल्याने याठिकाणी वाहनांपेक्षा व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहे. खड्डे बुजविल्यास या रस्त्याने वाहतूक सुरू होऊन समांतर रस्त्याचा भार कमी होण्यास मदत होणार आहे.

### अजितदादांना श्रद्धांजली

**लातूर :** महराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वाचे स्व.अजितदादा पवार साहेब यांचे विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाले. त्यांचे आत्म्यास शांती लाभो अशी प्रार्थना करूनजिल्हा पणन कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पणन महासंघाचे संचालक आबासाहेबजी पाटील, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती लातूर चे सचिव श्री अरविंद पाटील, जिल्हा पणन अधिकारी श्री मनोज बाजपेयी, कार्यलय अधिक्षक श्री विलास सोमारे, श्री बाबुराव म्हेत्रे जिल्हा पणन अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, कृषि उत्पन्न बाजार समिती सर्व कर्मचारी तसेच महाबिज चे अधिकारी कर्मचारी यांचे कडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## शिक्षणमहर्षी वसंतराव काळे यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** शहरातील औद्योगिक परिसरामध्ये असलेल्या जिजामाता विद्यालयात शिक्षण क्षेत्रातील थोर व्यक्तिमत्त्व शिक्षण महर्षी स्व. वसंतराव काळे यांचा २० वा स्मृतिदिन सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य मधुकरराव गायकवाड हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य दादासाहेब कांबळे उपस्थित होते. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे, प्राचार्य शुभांगीताई काळे, संचालिका संजना काळे, विपुल काळे, प्राचार्य देविदास कोल्हे, गोकुळ मतकंटे, प्रा. दत्तात्रय मुंडे, प्रा. बाबासाहेब सोनवणे, साविजेता खंदारे, राजकुमार शिंदे, शंकर पांचाळ, शंकर दुरुगकर, प्रा. चंद्रकांत सूर्यवंशी, प्रा. सुधीर बाळापुरे, भाग्यशाली गुडे, वैशाली वाघमारे, गंगासागर गुंडेकर, वर्षा येलमटे, वैशाली फुले, सविता राठोड, अरविंद पदातुरे, प्रदीप खामगावकर, राजाभाऊ वाघमारे, बालाजी साबळे, आप्पासाहेब देशमुख, अर्जुन कांबळे, बालाजी पवार



आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी शिक्षण महर्षी वसंतराव काळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा, दूरदृष्टीचा व समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या स्मृतिदिन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त व शिक्षणाची गोडी निर्माण होण्यास मदत होत असून, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बालविवाह मुक्त भारतासाठी विद्यार्थ्यांची सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :**बालविवाह मुक्त भारत अभियान आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्याच्या अंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या 'आशा' मोहिमेअंतर्गत लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर येथील संत नामदेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी प्रमुख



मार्गदर्शन केले. बाल विवाहाचे दुष्परिणाम, बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६, बाल संरक्षणाशी संबंधित विविध कायदे याबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी विद्यार्थ्यांना बाल विवाहास कठोर विरोध करण्याचे आवाहन केले. तसेच बाल विवाहामुळे मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासावर विपरीत परिणाम होतो. विवाहासाठी मुलीचे किमान वय १८ वर्षे आणि मुलाचे २१ वर्षे असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात मुख्याध्यापिका श्रीमती बी. एस. परगे, मुख्य न्यायरक्षक ए. जे. तिवारी, बालसंरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. श्री. गिरवलकर तसेच इतर मान्यवरांच्या आवाहनानुसार उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी बालविवाह मुक्त भारत निर्माण करण्यासाठी सामूहिक शपथ घेतली.

## 'त्या' जखमी तरुणाचा अखेर मृत्यू; दोन्ही आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** मागील भांडणाची कुरापत काढत किरकोळ कारणावरून चाकूने भोसकल्याने जखमी झालेल्या एका तरुणाचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला आहे. या प्रकरणी दोघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केले आहे.

लातूर शहरातील आंबेडकर चौकात रविवारी (दि.१) रात्री पावणे अकरा वाजेच्या सुमारास प्रज्वल संजय मस्के (वय २१, रा. बौध्द नगर, लातूर) या तरुणाला त्याच्या मित्राने चाकूने बरगडीवर, पोटात भोसकले होते. चाकू खोलवर घुसल्याने घटनास्थळावरच प्रचंड रक्तस्त्राव झाला होता. त्याला तत्काळ उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. मात्र मध्यरात्री १२.३४ वाजेच्या सुमारास प्रज्वल मस्के याला मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी मयताचा चुलत भाऊ अतीश मस्के (रा. बौध्द नगर, लातूर) याच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपी गणेश सुरेश गायकवाड (वय १९,) व भीमा बालाजी सूर्यवंशी (वय १९, दोघेही रा. आनंद नगर, लातूर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड करीत आहेत. घटनेचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याने पोलिसांना आरोपींची ओळख पटविण्यात यश आले. तत्काळ पोलिसांनी दोन पथके तयार करून त्यांचा शोध सुरू केला. संजयनगर भागात दोन्ही आरोपी लपून बसले होते. त्यांच्याकडून पोलिसांनी कोयता जप्त केला आहे. प्रज्वल मस्के खूनातील दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्यानंतर त्यांना सोमवारी (दि.२) न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांनी सांगितले.

## 'राजमाता जिजामाता'त पालक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता विद्यालयात शनिवारी पालक मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती देऊन, विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी एन. पी. सोनवणे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संस्था समन्वयक अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे यांची प्रमुख उपस्थित होते.पालक मेळावे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाळा-पालक संबंध दृढ करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून आपल्या पालकांचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन सोनवणे यांनी केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, या विद्यालयात विद्यार्थ्यांना संस्कारासोबत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी बाळगून नियमित सराव करून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

# शहरातील गुन्हेगारी रोखण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०३ फेब्रुवारी :** लातूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीने सीमा ओलांडली असून, सामान्य नागरिक दहशतीच्या छायेखाली वावरत आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने सोमवारी (जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन आमदार अमित देशमुख यांचे या संदर्भातील निवेदन दिले.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची आग्रही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनाद्वारे आमदार अमित देशमुख यांनी रविवारी रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात प्रज्वल मस्के या तरुणाच्या हत्येचा संदर्भ देत पोलीस प्रशासनाला जाब विचारला आहे. सदरील धक्कादायक घटना स्वतः आ. देशमुख यांनी पाहिली असून, भरचौकात लोकांसमोर तरुणाची हत्या होणे हे अत्यंत क्लेशदायक असल्याचे त्यांनी या पत्रात नमूद केले आहे. लातूर हे शिक्षण आणि व्यापाराचे केंद्र आहे. मात्र मागच्या काही महिन्यांपासून वाढत चाललेल्या खुनांच्या घटना, अमली पदार्थांची विक्री आणि जमिनींवरील अतिक्रमणे यामुळे शहराची प्रतिमा मलीन होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली आहे.

लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्यामार्फत पो-




लीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात लातूर येथील शांतता, सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर तात्काळ मोक्का किंवा तडीपारीसारख्या कडक कारवाया करण्यात याव्यात. तसेच रात्रीची गस्त वाढवून अवैध धंदे कायमचे बंद करण्यात यावेत, अशा प्रकारच्या मागण्या देखील आ. देशमुख यांनी केले आहेत. पोलिस प्रशासनाने तातडीने गुन्हेगारांवर वचक निर्माण नाही केल्यास जनतेच्या सुरक्षेसाठी काँग्रेस पक्षकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या शिष्टमंडळात मनपा गटनेते विजयकुमार साबदे, नगरसेवक विकास कांबळे यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बिलोलीत हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर विशेष पथकाची धाड

## पाच जुगाऱ्यांना अटक : सतरा लाखाचा मुद्देमाल जप्त : पंधरा जुगारी फरार

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ३ फेब्रूवारी-**
बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावळी रोडवर असलेल्या हाय प्रोफाइल जुगार अड्ड्यावर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या विशेष पथकाने धाड मारुन तब्बल १६ लाख ६८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पाच जुगाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले असून १५ जुगारी फरार झाले आहेत. विशेष म्हणजे उपविभागीय पोलीस अधिकारी व बिलोली पोलीसांच्या आशिर्वादाने हा जुगार अड्डा सुरु असल्याची आता चर्चा सुरु झाली आहे.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या जुगार अड्ड्यासह अवैध धंदे सुरु आहेत. एरवी कुठल्याही पोलीस ठाण्यातच्या हद्दीत सुरु असलेल्या अवैध धंद्यावर कायवाई करणाऱ्या उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावर यांना त्यांच्याच नाकाखाली सुरु असलेल्या अवैध धंद्याची माहिती मिळाली नाही परंतु पोलीस उपमहानिरीक्षकाच्या पथकाला ही माहिती मिळाल्याने त्या पथकाने सुरु असलेल्या हाय प्रोफाइल जुगार अड्ड्यावर कारवाई केल्याने पानेगावर यांच्यासह बिलोली पोलीस ठाण्याच्या ठाणेदार भोसले यांचे पितळ उघडे पडले आहे.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावळी रोडवरील प्रताप अंकुशकर यांच्या शेतातील एका पत्र्याच्या शेडमध्ये काही लोक बेकायदेशीररित्या 'अंदर-बाहेर' नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या विशेष पथकातील सहायक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सूरजकुमार तिडके आणि त्यांच्या पथकाने सोमवारी दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११.५५ च्या धाड मारली.

यावेळी रसुल शेख अहमद शेख वय ४५ रा. बिलोली, बोझा चंद्रशेखर गौड वय ५०, रा. मोसरा, जि. निजामाबाद, आकाश विठ्ठल कांबळे वय ३३, रा.बोधन, जि. निजामाबाद, कामी रेड्डी रमन्ना रेड्डी वय ३५, रा.सालुपरा, जि. निजामाबाद, शेख नबी मिनुमियाँ वय ३२, रा. सालुरा, जि. निजामाबाद यातील बहुतांश आरोपी शेजारील तेलंगणा राज्यातील आहेत ते येथे जुगार खेळण्यासाठी आले होते.

पोलिसांनी धाड टाकली त्यावेळी छाप्यात काही आरोपी अंधाराचा फायदा घेऊन १५ जुगारी पळून जाण्यात यशस्वी झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण १६,६८००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. यामध्ये रोख रक्कमः ३ लाख ६ हजार रुपये. विविध कंपन्यांचे महागडे ५ स्मार्टफोन ४० हजार रुपये किमतीची एक विना क्रमांकाची मोटारसायकल व इतर जुगाराचे साहित्य जप्त केले आहेत.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सूरजकुमार तिडके यांच्या फिर्यादीवरून बिलोली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने पार पाडली. शहरात अवैध धंदे चालवणाऱ्यांचे या कारवाईमुळे धाबे दणाणले आहेत.



# धनेगाव येथे अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ फेब्रूवारी-**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अस्थीकलश दर्शन डेअरी चौक धनेगाव येथे दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता राष्ट्रवादीचे गंगाधर कवाळे यांनी अस्थीकलश दर्शन घेऊन व भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे विमान अपघातात शहीद झाले. यांच्या अस्थीकलश दर्शनासाठी त्यांची हस्ते महाराष्ट्रभर दादांच्या चाहत्या जनतेच्या दर्शनासाठी जिल्ह्यातून अस्थीकलश दर्शन करण्यात येत आहे. दिनांक ३ फेब्रुवारी रोजी ही अस्थीकलश सकाळी ८:३० वाजता आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे जनसंपर्क कार्यालय वसंत नगर येथून पुढील जिल्हाभरातील दर्शनासाठी जात असताना. डेअरी चौक धनेगाव येथे राष्ट्रवादीचे गंगाधर कवाळे यांनी अजित दादा पवार यांच्या अस्थीकलश दर्शनासाठी डेअरी चौक धनेगाव येथे शेकडो कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थित

अस्थीदर्शन करण्यात आली. अस्थीकलश डेअरी धनेगाव चौक येथून सिडको, चंदासिंग कॉर्नर, नायगाव, नर्सी, मुखेड, कंधार, लोहा मार्गी विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर देवस्थान येथे गोदाकाठी अस्थीकलश विसर्जन सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले.सकाळी डेअरी येथील शोकाकून राष्ट्रवादी पक्षाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, मा.आ.ओमप्रकाश पोकर्णा,मा.आ. मोहनराव हंबर्डे, प्रवीण पाटील चिखलीकर, गंगाधर कवाळे, शिवराम पाटील घुरपडे, निलेश भालके, भगवान कवाळे, गफूर सहाब, तातेराव ढवळे, शिवाजी पुयड, नितीन शिंदे, शंकर शिंदे, कोंडीबा कवाळे, दौलत सावंत, उद्धव कवाळे, रमेश वाघमारे, कैलास शिंदे, प्रभाकर गायकवाड, शेख इमाम, शेख येजाज,शेख बाबू, लांडगे, अनिल कांबळे यांच्यासह राष्ट्रवादी पार्टीचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



## हदगाव नगरपालिका क्शन मोडवर; थकीत गाळ्यांना ठोकले सील

**हदगाव -** हदगाव नगरपरिषद येथे काही दिवसापूर्वी आयएएस दर्जाचे उच्चपदस्थ अधिकारी म्हणून दोनूरु अनन्या रेड्डी ह्या प्रभारी मुख्याधिकारी म्हणून रुजू झाले असून त्यांनी नगरपालिकेच्या कर रुपी जमा होणाऱ्या रक्कमेत वाढ व्हावी या उद्देशाने नगरपालिका च्या मालकीचे असलेले गाळेधारकांना गाळेभाडे थकीत रक्कम वसूल करण्यासाठी नोटीस देऊन सुद्धा रक्कम भरले नाहीत असे गाळेधारकांना आज ताळेबंद ची कारवाई करण्यात आली. यावेळेस स्थापत्य अभियंता सचिन वाघमारे,रचना सहाय्यक धीरज झुडपे, कर निर्धारण अधिकारी प्रवीण मंगनाळे, गोविंद नागरगोजे यांच्यासह पालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.
प्रभारी मुख्याधिकारी रेड्डी यांनी शहरातील गजबजलेल्या ठिकाणी असलेल्या भाजीपाला दुकानांमुळे वाहनधारकांना होत असलेल्या त्रासाबद्दल व वाहतूक सुरळीत व्हावी याकरिता याची दखल घेत त्यांना हक्काचे असलेले भाजी मार्केटमध्ये क्रमवारी पद्धतीने दुकाने देऊन त्यांचे स्थलांतर करण्यात आले. कर म्हणून जमा होणाऱ्या रक्कम व पालिका प्रशासनाचे असलेले गाळेधारकांनी भाडेरूपी थांबविली रक्कम तात्काळ भरण्यासंदर्भात नोटीस देऊन सुद्धा गाळे भाडे भरले नाहीत अशा राजीव गांधी मार्केट मधले दुकानांना ताळेबंदीची कारवाई आज रोजी करण्यात आली असून यामुळे गाळे भाडे थांबवलेल्या दुकानदारांमध्ये चांगलीच खळबळ उडाली होती.

## पुरोगामी अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड.ए.जे.शेख यांची बिनविरोध निवड

**मुखेड -** जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,मुखेड येथील पुरोगामी अभिवक्ता संघाची २०२६-२०२७ साठीची नुतन कार्यकारणी गठीत करण्यात आली असून यावेळी पुरोगामी अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विधिज्ञ ड.ए.जे.शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली




असून उपाध्यक्षपदी ॲड.ए.पी. लष्करे सचिवपदी ॲड.टी.एम. वाघमारे सहसचिव पदी ॲड.पी.सी. कांबळे, कोषाध्यक्ष पदी ॲड.वाय. जे.तांबोळी, महिला प्रतिनिधी पदी ॲड.ए.एच.वडजे तर प्रसिद्धीप्रमुख पदी ॲड.मिलिंद कांबळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. पुरोगामी अभिवक्ता संघाचे माजी अध्यक्ष ॲड.यु.बी.सोनटक्के यांच्या कार्यकारणीचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे नुतन कार्यकारणीचे गठण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत निवडणूक अधिकारी ॲड.आर.जी.इमडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी ॲड.एम.सी.गवलवाड यांच्या सुचनेनुसार सदर निवडणूक कार्यक्रम पार पडला असून अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड.ए.जे.शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी ॲड.ए.पी.लष्करे सचिवपदी ॲड.टी.एम. वाघमारे सहसचिव पदी ॲड.पी.सी.कांबळे, कोषाध्यक्ष पदी ॲड.वाय. जे.तांबोळी, महिला प्रतिनिधी पदी ॲड.ए.एच.वडजे तर प्रसिद्धीप्रमुख पदी ॲड.मिलिंद कांबळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली असून यावेळी पुरोगामी अभिवक्ता संघातील सदस्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## केंद्रस्तरीय स्पर्धेत सावरकरनगर शाळेचे यश

**इस्लापूर -**गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती किनवट तर्फे दि. ३१ जानेवारी रोजी आयोजित केंद्रस्तरीय बुद्धिबळ व पाढे पाठांतर स्पर्धेत इयत्ता १ ते ४ थी गटात जि.प. प्रा. शाळा सावरकरनगर, ईस्लापुर येथिल मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला. किनवटचे गट शिक्षणाधिकारी अनिल महामुने यांच्या संकल्पनेतून किनवट तालुक्यात जि.प. शाळांमधून बुद्धीबळ व पाढे पाठांतर स्पर्धा आयोजित करन्यात आल्या होत्या. याचाच एक भाग म्हणून कें. प्रा. शाळा भिसी येथे केंद्रस्तरीय बुद्धिबळ व पाढे पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये पहिला गट इयत्ता १ ते ४ मधुन पाढे पाठांतर स्पर्धेत जि.प.प्रा. शाळा सावरकरनगर इस्लापुर ची इयत्ता दुसरी तील विद्यार्थीनी कु.मेघना नवनाथ नागरगोजे हिने प्रथम क्रमांक पटकावला तसेच बुद्धिबळ स्पर्धेत इयत्ता १ ते ४ गटात याच शाळेची इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी कु. दुर्वा संदिप धुमाळ हिने प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक अरुण पळसपुरे, मार्गदर्शक राजेंद्र देवकते, शा.व्य.स. अध्यक्षा सौ. सुभांगी वाघमारे उपाधक्ष सचिन पुरी, साहेबराव पठसपुरे, जगदिप हनवते, प्रमोद जाधव विकास माहुरकर आदिनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

I {SHAIKH MANJUR AHEMAD} S/o. {SHAIKH MAHEBOOB} Age {52} Years, Address: {AT POSTS: DEGLOOR TQ: DEGLOOR DIST. NANDED} has changed my Name from {SHAIKH MANJUR AHEMAD} S/O {SHAIKH MAHABOOB} to {SHAIKH MANJUR AHEMAD} S/O{SHAIKH MAHEBOOB} TO NEW NAME {SHAIKH MANJUR AHEMAD SHAIKH MAHEBOOB} TO vide Affidavit Bond Number {59AB991424} dated {15/01/2026} before Notary by

# विश्वशांती महायज्ञ व रजत महोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ फेब्रूवारी-**
श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी नवीन नांदेड (महाराष्ट्र) येथे दि.५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विश्वशांती महायज्ञ आणि श्री केदारनाथ रावळ जगद्गुरू पट्टाभिषेक रजत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी केदारनाथ मंदिराचा देखावा तयार करण्यात आला असून या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा खा.अशोक चव्हाण यांनी नुकताच घेतला. या महोत्सवाचे जय्यत तयारी चालू आहे.

गोपाळ चावडी येथील श्री गुरू दशमुख आश्रम, भिमाशंकरनगर गोपाळचावडी नवीन नांदेड (महाराष्ट्र) येथे ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत गोपाळचावडी येथे १०८ महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही उपस्थिती राहणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री. केदार जगद्गुरु यांचे आशिर्वाद घेवून सांगितले. एवढेच नसून या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घेवून येणार असल्याचेही अभिवचन



जगद्गुरु यांना त्यावेळी दिले.या कार्यक्रमासाठी आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, उत्तराखंड यासह आदी राज्यांचे मुख्यमंत्री, साधु, संत, महंत यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार आहे. यामध्ये दि.५ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ ते ७ या वेळेत श्रीमद् जगद्गुरू विश्वराध्य मुर्तीस रुद्रअभिषेक यानंतर पंचाचार्य ध्वजारोहण त्यानंतर शोभा यात्रा ही शोभा यात्रा श्री केदारेश्वर सतसंग भवन आनंदनगर ते जुना मोंढा अशी निघणार आहे. या नंतर धर्मसभा त्यानंतर दि.६ ते ११ फेब्रुवारी या कालावधीत दैनंदिन कार्यक्रमात श्रीमद जगद्गुरू विश्वराध्य मुर्तीस रुद्राभिषेक त्यानंतर यज्ञ स्वाहाकार त्यानंतर महाप्रसाद, शिवकथा यज्ञ स्वाहाकार, धर्मसभा आणि किर्तन जागरण हा दैनंदिन कार्यक्रम पार पडणार आहे. समारोप दि.१२ फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे. यामध्ये पटाभिषेक रजत महोत्सव आणि धर्मसभा यानंतर या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.यात विश्वशांती महायज्ञात १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले आहेत. याचबरोबर दररोज एक लाख नागरीकांना महाप्रसादाचा लाभही घेता येणार आहे. यासाठी विशेष मंडप उभारण्यात आले आहे. या विश्वशांती महायज्ञाच्या सोहळ्याच्या अंतिम तयारीची पाहणी श्री हिमवन केदार वैराग्य सिंहासनाधीश्वर श्री.श्री. श्री.१००८ केदारनाथ रावल जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजी,

खा.अशोक चव्हाण यांनी केली असून यावेळी त्यांच्यासोबत नगसेवक किशोर स्वामी, नगरसेवक संजय घोगरे, बालाजी पांडागळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# चैनपूर येथे आ. जितेश अंतापूरकरांच्या हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३ फेब्रूवारी-**
तालुक्यातील चैनपुर येथील ग्रामविकासाला गती देणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. गावातील अंतर्गत सी.सी. रस्ते, पथदिवे उभारणी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती या महत्त्वाच्या ९० लक्ष रु.निधिच्या कामांचा भूमिपुजन यावेळी करण्यात आला.



गावकऱ्यांच्या मूलभूत व पायाभूत सुविधांसाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे आ. अंतापूरकर यांनी यावेळी सांगितले. विकासकामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास परिसरातील प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, आ. अंतापूरकर यांनी गावातील हरीनाम व शिवनाम सप्ताहास भेट देत भजनी मंडळ व ग्रामस्थांसोबत हरिनामाच्या गजरात सहभागी होत भक्तिरसात तल्लीन झाले. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. यानंतर शहापूर येथून पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडींचे दर्शन त्यांनी घेतले. तसेच शेळगाव नृसिंह येथे आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ घेत वारकऱ्यांशी संवाद साधला. विकासकामांसोबतच सामाजिक व धार्मिक उपक्रमांना दिलेले प्रोत्साहन हे लोकप्रतिनिधी म्हणून आ. अंतापूरकर यांचे संवेदनशील नेतृत्व दर्शवते, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या भुमिपुजन कार्यक्रमाचे आयोजक भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी उपसरपंच मारोतीराव हनेगावे व सरपंच प्रदीप वाघमारे यांनी केले तर

यावेळी नांदेड जिल्हा परिषदेकडून माजी शिक्षण सभापती माधवराव मिसाळे , भाजपा जिल्हा चिटणीस, नांदेड अनिल पाटील खानापूरकर, तसेच भाजपा नेते ताराकांत पाटिल नरंगलकर, हाणमंत डोपेवाड, रमेश पाटील वनाळीकर, तुकाराम कोकणे, सुरेश नावेकर, बुथ अध्यक्ष राजू ईबितदार, नामदेव कायतवाड, पापना दंडलवाड, संजय नामपले, प्रशांत बोरवाड, विठ्ठल देशमुख, राम पाटील, हाणमंत हनेगावे आणि गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

# मोंढा परिसरातील पत्रा शेड प्रकरणावरुन अधिकाऱ्यांवर गंडातर येण्याची शक्यता

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३ फेब्रूवारी-**
कृर्षी उत्पादन बाजार समितीने ज्या व्यापाऱ्याला मोंढा परिसरात दुकान नाही. अशा व्यापाऱ्याला कृउबा समितीने ठराव घेऊन मोकळी जागा देण्याचे ठरले.त्या व्यापाऱ्यांनी टिन पत्रा शेडचे दुकान तयार करुन व्यवसाय करावा असा निर्णय झाला . जागा घेतलेल्या व्यापाऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने दुकाने तयार करुन घ्यावेत असेही पण या प्रकारातुन संचालकात व उपसभापती यांच्यात वादाची ठिणगी पेटली हा प्रकार चव्हाट्यावर आला. या प्रकरणाला क्लिनचीट नाही पण अधिकाऱ्यांवर गंडातर येऊ शकते अशी मोंढा परिसरात चर्चा ऐकायला मिळत आहे.

कृर्षी उत्पादन बाजार समितीमध्ये अनेक वर्षे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या ताब्यात होती यांना हाटवण्यासाठी माजी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष सध्या नगर पालिकेचे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी सर्वांचे एकजुट करुन निवडनूक पॉनल तयार केले त्या पॉनलला भरघोस यश मिळाले.या प्रचार पॉनल मध्ये माजी आ.रोहिदास चव्हान,माजी आ.श्यामसुंदर शिंदे,माजी आ.मोहन आण्णा हांबर्डे, प्रा मनोहर धोंडे,माजी आ.शंकर आण्णा धोंडगे,सतिश उमरेकर यांनी एकजूट दाखवून बाजार समितीवर आपली सत्ता काबिज केली. विक्रांत शिंदे हेच सभापती होणार हे सर्वनुमते ठरले पण उपसभपती निवडीत चुरस निर्माण झाली.मोहन आण्ण हांबर्डे यांच्याकडुन दत्ता दिघे कारेगावकरसह अनेक जन आपले पारडे जड करण्यासाठी अनेकांची भेट घेऊन नशिब आजमित होते.माजी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष शरद पवार पक्षाच्या कोठ्यातुन आण्णा पाटील पवार यांच्या नावाला हिरवा कंदील मिळवून देत होते, कारण माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व आमर राजुरकर यांचे विश्वासू शरद पवार मानले जात होते त्यांच्या पक्ष कामाची नोंद घेतली जात होती आणि कॉंग्रेसचे जास्त संचालक निवडुन आले होते.

अखेर अण्णा पवार यांना हिरवा कंदील मिळाला आण्णा पवार यांना उपसभापती पद निश्चीत मानले जात होते, पण प्रत्येकाला संधी मिळावी म्हणुन एक ..एक वर्षे उपसभापतीचा कार्येकाळ ठेवला होता. पक्ष आहे त्याच ठिकाणी राहिला नेते आणि पदाधिकारी, संचालक आपोआप संत्तार झाले माजी आ.मोहन आण्णा हांबर्डे,शरद पवार,आण्णा पवार,काही संचालक कॉंग्रेस सोडुन आ.प्रताप पाटील चिखलीकर गटात दाखल झाले उपसभापती पदावरील व्यक्तीला अधिकचा कार्येकाळ मिळला.आण्णा पवार उपसभापती पद सोडण्याची तयारी दाखवत नसल्याने अनेक संचालकात नाराजी पसरल्याने गैरप्रकाराचे गाठोडे बाहेर येत आहेत.

उपसभापतीच्या मनमानी गैरकारभारा बदल संचालकात धुसफुस सुरु झाली. या कार्यालयातील शासनाचा प्रतिनिधी लोकप्रतिनिधी बरोबर अप्रतेक्ष वाटा ठेवतो. हि बाब अनेक संचालकाला खटकली. कृउबा समितीच्या मोकळ्या जागेवर दुकाने बाधंण्या करीता किंव्हा जागेची विल्हेवाट लावण्याकरीता वरिष्ठाची मानेता घेणे गरजेचे आहे. या प्रक्रियेत दुकाने तयार केल्यावर कागदी ताळमेळाचा खेळ सुरु झाला. दुकान तयार करताना जाहिर प्रगटन देणे बंधनकारक आहे.हि प्रकिया गुपचुप केली बाजार पेठेत आजही ४० ते ५० व्यापारी भाड्याच्या दुकानात व्यापार करतात हि सत्तेता आहे ह्या प्रकरणाला क्लिनचीट नाही पण व्यापारी, संचालक, शेतकऱ्यांत चर्चा मात्र वेगळी ऐकायला मिळत आहे.

# सैन्य दलात प्रदीर्घ सेवा करुन परतलेल्या जवानाचे भव्य स्वागत

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ३ फेब्रूवारी-**
भारतीय सैन्य दलात २२ वर्षाची प्रदीर्घ सेवा करून कर्मभूमीतून मायभूमीत आलेले मुक्रमाबाद नगरीचे भूमिपुत्र सैनिक व्यंकट बाबुराव सूर्यतले यांची दि.२ फेब्रुवारी सोमवार रोजी मुखेड येथील राजे छत्रपती अकॅडमीती विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भारत माता की जय या आवाजात उत्साहात मानवंदना दिल्यानंतर अकॅडमी पासून रॅली ची सुरुवात झाली तसेच मुखेड शहरातील मुख्य रस्त्याने डीजे च्या आवाजात जन्मभूमी मुक्रमाबाद पर्यंत भव्य मोटारसायकल रॅली व मिरवणूक काढण्यात आली..मुखेड शहर व बाराळीतून रॅली काढण्यात आली. जात असताना गाडी थांबवून जागोजागी अनेक नागरिकांनी सैनिक व्यंकट सूर्यरतले यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार



केला. त्यानंतर मुक्रमाबाद येथे गावकऱ्यांच्या वतीने भव्य नागरिक सत्कार सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी प्रा विजय खानापूरे यांचा सोहम प्रस्तुत देशभक्तीपर बहारदार गीतांचा कार्यक्रम तसेच रात्री ०८ वाजता ह भ प वैजनात महाराज थोरात हिंगोलीकर यांचे समाज परिवर्तनावर कीर्तन पार पडले.

या भव्य नागरि सत्कार सोहळ्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा मुखेड येथील राजे छत्रपती अकॅडमीचे संचालक ज्ञानेश्वर पाटील डुमणे होते. तर उद्घाटक मुक्रमाबाद नगरीचे सरपंच सौ. अंजिताताई बोधणे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक राजेश चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक शंकर मोरे, काँग्रेस नांदेड जिल्हा सरचिटणीस दिनेश आप्पा आवडके, ग्रा.प.सदस्य बालाजी बोधने, सैनिक सय्यद इब्राहिम, उपसरपंच चांद साब खुरेशी, गंगाधर सावकार वट्टमवार, प्रा.अरुण भोसले, पत्रकार रज्जाक कुरेशी, पत्रकार जलील पठाण, पत्रकार संजय राचलवार, आदिंची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच प्रतिनिधी बालाजी आप्पा बोधने यांनी केले तर पत्रकार रजाक कुरेशी यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

आपले मनोगत व्यक्त करत असताना सैनिक व्यंकट सूर्यतले यांनी हा सन्मान सोहळा पाहून माझ्या आई-वडिलांना खूप आनंद झाला असता पण ते आज आमच्यात नाहीत या गोष्टीचे खूप दुःख वाटते. तसेच ऑपरेशन सिंदूर मध्ये माझा सहभाग होता आणि तिथला एक धक्कादायक किस्सा सांगत बावीस वर्षाचा खडतर प्रवास व गरीबीतलं बालपणही उपस्थितांना अगदी भावुक होऊन सूर्यतले यांनी सांगितले तसेच मुलगा प्रीतम आणि मुलगी प्रणाली यांनीही आपले पप्पा जेव्हा नसायचे तेव्हा मम्मी कशी दिवस काढायची आणि पप्पांना कशी हिम्मत द्यायची घरचा बाप जेव्हा घरी नसतो तेव्हा घरची परिस्थिती काय असते ते आम्ही स्वतः अनुभवलंय अशा भावना दोन्ही लेकरांनी व्यक्त केले...

आपल्या अध्यक्षीय भाषणात ज्ञानेश्वर पाटील डुमणे यांनी बोलत असताना म्हणाले की आई-वडिलांची आणि सैनिकांची जिवंत असतानाच सेवा आणि सन्मान करा,, खरा देव माणसात असतो, देवाला माणसात बघा दगडात नाही. कारण आई-वडिलांमुळे आपण आहोत आणि आपला परिवार सोडून देशाच्या सीमेवर माझा सैनिक तैनात आहे म्हणून आपण आपल्या परिवारात सुखरूप आहोत..सैनिकाला जात धर्म पंथ आणि स्वार्थ नसतो ज्याचं चारित्र सुद्धा आहे, ज्यांच्यावर आई-वडिलांचा संस्कार आहे आणि ज्याचं काळीज वाघासारखं निर्भीड आहे त्याला सैनिक म्हणतात असे बोलताना डुमणे पाटील यांनी सैनिकांचं बलिदान समजावून सांगितले.. त्यानंतर सैनिक सय्यद इब्राहिम यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. त्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली...या सत्कार सोहळ्यासाठी राजे छत्रपती अकॅडमीचे विद्यार्थी तसेच गावातील मान्यवर, माता भगिनी व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रम यशस्वीतेसाठी गोविंद सूर्य तले बालाजी सूर्यतले,जलील पटेल, धनाजी बोयवार, आणि वर्गमित्र फेरोज पठाण, प्रकाश ओबरे,आदिनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात...

### अलौकिक वळणे आणि भावनिक संघर्ष; ‘घरवाली पेडवाली’ निर्णायक टप्प्यात

**छत्रपती संभाजीनगर :** TV वरील ‘घरवाली पेडवाली’ मालिकेत सीरत कपूर साकारत असलेली सावीची भूमिका सध्या चर्चेत आहे. मंदिरातील विधी, धक्कादायक रहस्ये आणि जीतू-लतिका यांच्याशी संबंधित अलौकिक घडामोडींमुळे कथानक अधिक उत्कंठावर्धक बनले आहे. कुलदेवीशी निगडित भागात भीती, श्रद्धा आणि भावनिक संघर्ष यांचा प्रभावी संगम दिसणार आहे.

सीरत कपूर म्हणाल्या की, सावीप्रमाणेच आपणही भावूक व खंबीर आहोत. ही भूमिका साकारताना विविध भावनांचा अनुभव येतो. सहकलाकारांशी जिव्हाळ्याचे नाते असल्याने पडद्यावरील सादरीकरण अधिक नैसर्गिक होते. मंदिरातील दृश्यांच्या चित्रिकरणावेळी थरारक वातावरणामुळे अनुभव खास ठरल्याचे त्यांनी सांगितले.

मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता TV वर प्रसारित होते; भाग ZEE5 वरही उपलब्ध आहेत.

### गणेश कार्तिकेय’ ने पूर्ण केले १०० हृदयस्पर्शी एपिसोड्स

**मुंबई :** सोनी सबची पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय भगवान गणेश (निर्णय समाधिया) आणि शिव परिवाराच्या कथा प्रेक्षकांना सतत मोहून टाकत आहे. आध्यात्मिक वैभवाला उबदार, आपुलकीच्या कौटुंबिक क्षणांशी जोडत हा शो सुंदरपणे दाखवतो की दिव्य परिवार प्रेम, जबाबदारी आणि संघर्षाचा अनुभव कसा घेतो भगवान शिव (अविनेश रेखी) आणि देवी पार्वती (श्रेनु पारिख) यांच्या दिव्य गृहात.शोने १०० एपिसोड्स टप्पा गाठल्याच्या या महत्त्वपूर्ण क्षणी, संपूर्ण कलाकारवर्ग कृतज्ञतेने या अर्थपूर्ण यशाचा उत्सव साजरा करत आहे. शोची सध्याची कथा, जी भगवान गणेश आणि पवित्र अष्टविनायक यात्रेच्या गाथांचा मागोवा घेते, प्रेक्षकांशी खोलवर जोडली गेली आहे. ही कथा आध्यात्मिक महत्त्व आणि भावनिक कथाकथनाचा प्रभावी संगम सादर करते. ही उपलब्धी श्रद्धा, मूल्ये आणि भावनिक सत्याशी निगडित कथांवरील प्रेक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रेमाचे प्रतिबिंब आहे.

# ड्रायव्हर दृष्टी’ मोहिमेत चालकांसाठी मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** वाहनचालकांच्या दृष्टीआरोग्याची काळजी घेत रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने एएसजी आय हॉस्पिटलतर्फे ‘ड्रायव्हर दृष्टी’ ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शहरात ही मोहीम २० जानेवारी ते ११ फेब्रुवारीदरम्यान ए.जी. प्राइम हाऊस, कांती चौक, रेल्वे स्टेशन रोड, नवीन उस्मानपुरा येथील एएसजी आय हॉस्पिटलमध्ये सुरू आहे.

मोहिमेचे उद्घाटन महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते झाले. यावेळी रुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी व नेत्रतज्ज्ञ उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत ऑटो, ट्रक, कॅब तसेच इतर व्यावसायिक वाहनचालकांसाठी मोफत डोळे तपासणी केली जात असून, आवश्यक असल्यास मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध आहे. यासाठी वैध वाहनचालक परवाना अनिवार्य आहे.

चालकांची स्पष्ट दृष्टी ही त्यांच्या उपजीविकेसह प्रवासी व समाजाच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची असल्याचे रुग्णालय प्रशासनाने नमूद केले. वेळेवर निदान व उपचारांमुळे अपघातांचा धोका कमी होऊ शकतो. या मोहिमेला चालकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पात्र वाहनचालकांनी ओळखपत्र व वाहनचालक परवान्यासह संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## पैठणला ई बसमुळे विद्यार्थ्यांचे हाल

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०३ फेब्रुवारी :** पैठण ते छत्रपती संभाजीनगर साठी राज्य परिवहन मंडळाच्या पैठण आगाराच्या वतीने साध्या बसेस जवळपास बंद करून ईलेक्ट्रिक बस सुरु केल्याने पासेस असलेल्या विध्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचे प्रचंड हाल होत आहेत. पैठण आगाराने या मार्गांवर पूर्वी प्रमाणे साध्या बसेस ही सुरु कराव्यात अशी मागणी होत आहे. पैठण छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर चालणाऱ्या वाहक असलेल्या साध्या ५ बसेस आगाराच्या वतीने बंद करण्यात आल्याने ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी समस्या जाणवत आहे. या रस्त्यावर ई – बस सुरु असल्याने आणि त्यात शैक्षणिक पास चालत नसल्याने ऐन परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांची डोकेदुखी वाढली आहे.




## जागतिक कर्करोग दिनानिमित्त मोफत कर्करोग तज्ज्ञ सल्ला शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मेडिकव्हर रुणालयातर्फे नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक कर्करोग दिनानिमित्त ४ ते ७ फेब्रुवारीदरम्यान मोफत कर्करोग तज्ज्ञ सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले असून उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

रुग्णालयाचे केंद्रप्रमुख डॉ. विशाल कुटे यांनी सांगितले की, कर्करोगाचे लवकर निदान, वेळेवर उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या शिबिरात डॉ. अनुप तोष्णीवाल, डॉ. आशुतोष तोंडारे, डॉ. रचिता बाहेती, डॉ. निकेत मंत्री आणि डॉ. आदित्य मंत्री हे तज्ज्ञ नागरिकांची तपासणी करणार आहेत. तसेच विविध कर्करोग तपासण्यांवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

७ फेब्रुवारीपर्यंत दररोज तपासणीची सुविधा उपलब्ध असून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी ०४०-६८३३४४५५ या क्रमांकावर संपर्क साधावा. पूर्वनोंदणी करून सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत रुणालयात भेट देता येईल.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दिली एमजीएमला भेट

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जेंडर, कल्चर अँड डेव्हलपमेंट स्टडीज या विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर अभ्यास दौऱ्यावर असताना महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील विविध विभागांना भेट दिली. यामध्ये विद्यापीठातील महिला व लिंगभाव अभ्यास विभागाला दोन प्राध्यापकांसह एकूण सतरा विद्यार्थ्यांनी भेट दिली.



या अभ्यास दौऱ्याचा मुख्य उद्देश हा पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रीय शिक्षण व संवादाचा एक भाग म्हणून संकल्पित करण्यात आला होता, ज्यामध्ये विविध क्षेत्रे व सामाजिक शास्त्रांमध्ये तसेच आंतर्विद्या अभ्यास शाखामध्ये लिंगभाव कशा प्रकारे आकार घेत पुढे कार्यान्वित होत जातो तसेच स्त्रीवादी दृष्टिकोन प्रत्यक्ष व्यवहारात कसा राबविला जातो, हे समजून घेण्यासाठी सदरील विद्यार्थ्यांनी एमजीएम विद्यापीठातील स्त्री व लिंगभाव अभ्यास तसेच आंतरविद्या अभ्यास शाखा आणि सामाजिक शास्त्रे या विभागातील प्राध्यापकांशी संवाद साधला.

यावेळी, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, डॉ. राम गायकवाड, डॉ.मारोती गायकवाड, डॉ.ह.नि.सोनकांबळे, डॉ.मानसी करंजगावकर, सचिन चौधरी, डॉ.भागवत वाघ, डॉ.अमर असोलकर, प्रा. अनीता फुलवाडे, डॉ. रामेश्वर कणसे, संशोधक विद्यार्थी हरी सोनवणे, नीलेश बेडके व सर्व संबंधित उपस्थित होते.

या भेटीचे आयोजन आणि प्रास्ताविक स्त्री व लिंगभाव अभ्यास विभागाच्या डॉ.मंजुश्री लांडगे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जेंडर, कल्चर अँड डेव्हलपमेंट स्टडीजचे विद्यार्थी घेऊन आलेले डॉ.ललित भावरे, डॉ.दीपा टाक आणि सूरज पवार यांनी या अभ्यास दौरा यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल एमजीएम विद्यापीठाचे आभार मानले.

## श्री.१००८ वासुपुज्य जैन मंदिराचा ४ था स्थापना दिवस साजरा



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** श्री.१००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार अंतर्गत श्री.१००८ वासुपुज्य खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर सेठीनगर जटवाडा रोड येथे मदिराच्या ४ था स्थापना दिवस निमीत्त विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम धर्मध्वजारोहनाने कार्यकमाची सुरैवात करण्यात आली. तदनंतर भगवान वासुपुज्य यांचा दुध दही,केसर,सर्व औषधी व जल पुष्पाने भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी इंद्र इंद्राणी सौ.पुजा संतोष सेठी, दिलीप पन्नालाल सेठी, ताराचंद अजमेरा हे भगंताचे इंद्र इंद्राणी बनले होते.

यावेळी चेतन कासलीवाल कुशल अजमेरा, अमित साहुजी, जितेद्र कासलीवाल, अंकुश गंगवाल, प्रविण गंगवाल, विलास लुगाडे आदीनी भगवंताचा अभिषेक केला. यावेळी उपस्थित भाविकांना रितेश किरण पहाडे परिवाराच्या वतीने प्रसादी वाटण्यात आली. स्थापना दिवसा निमीत्त मंदिरावर रोषणाई करण्यात आली होती. तसेच यावेळी शांती मंत्राचे वाचन उषा दिलीप सेठी यांनी केले. संध्याकाळी आरतीने कार्यकमाची सांगता करण्यात आली. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## एमजीएमच्या डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी राष्ट्रीय स्विमिंग स्पर्धेमध्ये पटकावली ५ पदके



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** अंडरवॉटर स्पोर्ट्‌स असोसिएशन इंडिया आयोजित दुसरी राष्ट्रीय मास्टर चॅम्पियनशिप आणि तिसरी राष्ट्रीय इंडोर फ्री डायव्हिंग चॅम्पियनशिप २०२५ –२६ शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये एमजीएम विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी ५ पदके पटकावित राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे नांव उज्वल केले आहे.

या स्पर्धांमध्ये १०० मीटर बीएफ बाय फिन्स (सुवर्ण पदक), ५० मीटर बाय फिन्स (रौप्य पदक), ५० मीटर एपनिया (रौप्य पदक), फ्रीडायव्हिंग अंडरवॉटर स्विमिंग विदाऊट फिन्स (कांस्य पदक) आणि अंडरवॉटर स्विमिंग बाय फिन्स (कांस्य पदक) आदि पदकांचा समावेश आहे.

या यशाबद्दल डॉ. श्रीनिवास मोतीयेळे यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.दिनेश वंजारे, अंडरवॉटर स्पोर्ट्‌स असोसिएशन इंडियाचे मयूर पाटील, आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी अभय देशमुख, डॉ.शशिकांत सिंग, डॉ. सदाशिव जव्हेरी, डॉ.रहीम खान, जॉय थॉमस, धनंजय फडके, जलतरण प्रशिक्षक अजय भोजने, निखिल पवार, अजय दाभाडे, निलेश खरे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## हभप कृष्णा महाराज आरगडे यांच्या कीर्तनाने सांगता

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०३ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कोकण वेस मारुती मंदिर येथे चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताहाचे आज दि १ रोजी ह भ प कृष्णा आरगडे यांच्या कीर्तने सांगता करण्यात ,ह भ प कृष्णा महाराज आरगडे बार्शीकर यांनी काल्याच्या कीर्तन प्रसंगी भगवान श्रीकृष्ण यांच्या बालपणाच्या गोकुळामध्ये गवळणीच्या खोड्या करणे, दही दूध चोरी करून खाणे अशा अनेक भगवान श्रीकृष्णावर चारित्र्यावर आपल्या मधुर वाणीतून भक्तांना मार्गदर्शन केले.



या कीर्तनप्रसंगी गायनाचार्य ह भ प नवनाथ महाराज जाधव,ह भ प शिवराम महाराज राऊत,ह भ प कृष्णा महाराज मोगल, तुकाराम महाराज राऊत,मृदंगाचार्य पारसनाथ घनवट, उद्धव महाराज नवपुते, गौरव हिवाळे, यांनी साथ दिली, कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते ,दि २५ जानेवारी पासून चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताह आज दि १३ रोजी सांगता करण्यात आली.

या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये रोज पहाटेपासून भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते तसेच रोज रात्री आठ ते दहा या वेळेमध्ये, किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते,दि १ रोजी कालचे किर्तन ह भ प कृष्णा महाराज आरगडे यांच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. या सप्ताहामध्ये ज्ञानेश्र्वरी पारायण वाचन ह भ प कृष्णा महाराज आरगडे व भागवत कथा वाचन ह भ प प्रल्हाद महाराज महालकर यांनी केले, दि ३१ रोजी सायंकाळी सात वाजता रामायण ग्रंथ, ज्ञानेश्वर ग्रंथांचे पूजन करून दिपोत्सव करण्यात आले, दि १ रोजी सकाळी नऊ वाजता भागवत कथा व ज्ञानेश्र्वर ग्रंथाचे रथा मधून स भु विद्यालय, मारवाडी गल्ली, खराडकर गल्ली, सोनार गल्ली मार्गे भानुदास एकनाथ टाळ मृदुंगाच्या गजारामध्ये मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीमध्ये बालगोपाल, महिला,पुरुष, भाविक भक्त या मिरवणुकीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, या सप्ताहाचे आयोजन समस्त गावकरी व श्री सावता भजनी मंडळ, यांनी केले होते या वेळी बंडू खराडकर, मधुकर वाणी, बनकर, लक्ष्मण वाघ, छकुला डोखे, गोरे, दत्तु राऊत, तुकाराम कोथिंबिरे, आदी भजनी मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## अंकुश लक्ष्मणराव धागगे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०३ फेब्रुवारी :** अंकुश लक्ष्मणराव धाडगे वय ७६ यांचे दि ३ फेब्रुवारी मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजता दुःखद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुल, दोन मुली, एक भाऊ, सुना, जावई, नातवंड, असा परिवार आहे, निवृत्ती मुख्याध्यापक लहू लक्ष्मणराव धाडगे यांचे मोठे बंधू होते.

## छत्रपती संभाजीनगरात १४-१५ फेब्रुवारीला अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०३ फेब्रुवारी :** ‘अभिमान मराठीचा – भाषा, सेवा, संस्कृतीचा’ या ध्येयवाक्यावर आधारित अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलन १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरात होणार आहे. बीड बायपास रस्त्यावरील एफ.आर.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय येथे संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, लेखक संमेलन, मराठी गझल संमेलन व काव्यसंमेलन आयोजित केले आहे. सायंकाळी ‘माकडाच्या हाती शेगडी’ या विनोदी नाटकाचे सादरीकरण होईल. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, शिक्षणाधिकारी अरविंद लाडकर, गझलकार प्रभा चव्हाण व साहित्य अकादमी सदस्य नरेंद्र पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.



दुसऱ्या दिवशी वैचारिक व साहित्यिक सत्रांसह विचारवंत मंगेश हाडवळे यांच्याशी संवाद आणि लेखक अरविंद जगताप यांची मुलाखत होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन कादंबरीकार विश्र्वास पाटील यांच्या हस्ते होणार असून डॉ. जवाहर पटेल उपस्थित राहतील.

संमेलनस्थळी ग्रंथदालन, कलादालन, वस्त्रदालन व खाद्यपदार्थांची दालने ही आकर्षणे असतील. डॉक्टर, साहित्यिक, विद्यार्थी व मराठीप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष डॉ. अनिल टाकळकर, सचिव डॉ. गणेश लहाने व समन्वयक डॉ. शेखर मोरे यांनी केले आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि.औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. २६/२०२६

अर्जदार:-१) आवडाप्पा नारायण औरंगे (गवळी), उ.वय ८२ वर्षे, धंदा शेती, रा. ईच्छादेवी रोड, चाळीसगांव, जि. जळगांव. २) शिवाजी नारायण औरंगे, वय ६५ वर्षे, धंदा मजुरी, रा. गलवाडा-अ, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद. ३) रामलिंग नारायण औरंगे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४) रख्मन नारायण औरंगे, वय ७६ वर्षे, धंदा-रिक्षा ड्रायव्हर, रा. चेंबुर, ईस्ट मुंबई.

विरूध्द-

गैरअर्जदारः निरंक

प्रकरण :- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. डी. व्ही. बोधनकर, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत नारायण रामा औरंगे हे दि. ०८/०२/२०१८ रोजी त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत नारायण रामा औरंगे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १३/०३/२०२६.

आज दि. ०३/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

**विभागीय लिपीक**
**(दिवाणी न्यायालय का स्तर सोयगांव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव)**

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०/२०२६

१) ललिताबाई दगडु डेहाडराव डेहाडराय, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर

२) उमेश दगडु डेहाडराव डेहाडराय वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ३) मनिषा प्रकाश देशमुख, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. छ. संभाजीगनर, ता. व जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध-

कोणीही नाही

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दगडु बुधा डेहाडराय डेहाडराव यांचा दिनांक ०३/०४/२०२५ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चयात वरील अर्जदार हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं, १ हे मयत दगडु बुधा डेहाडराय डेहाडराव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

**पु.ता. १६/०३/२०२६.**
**विभीगीय लिपीक**
**सहाय्यक अधिक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव.)**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

नि, क्रं.

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.२१/२०२६

१) बेबाबाई भागवत चव्हाण, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर २)जयश्री गजानन पोपळघाट वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बुलढाणा, ता. व जि. बुलढाणा ३) दिपाली दुर्गेश वाघ वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. छ. संभाजीगनर, ता. व जि. छ. संभाजीनगर ४) योगेश भागवत चव्हाण, वय २१ वर्षे धंदा शिक्षण, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर

विरुद्ध – कोणी नाही

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भागवत भिका चव्हाण यांचा दिनांक ०७/१०/२०१३ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चयात वरील अर्जदार हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत भागवत भिका चव्हाण यांचे वारस असुन त्यांना शासकिय /निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक २९/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशानुसार

**पु.ता. १६/०३/२०२६.**

**विभीगीय लिपीक**
**(दिवाणी न्यायालय क.स्तर सोयगाव)**

**सहाय्यक अधिक्षक**
**(दिवाणी व फौजदारी,न्यायालय, सोयगांव.)**

### जाहीर प्रगटन

**मा. एन. आर. डोके साहेब, सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क्र. ५६२/२०२५

पुढील तारीख २७/०२/२०२६

अर्जदार १) दत्तु शिवाजी निकुंभ, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद २ ) संगीता भ्र. शंकर पाटील, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडगाव पो. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) इंदुबाई भ. संतोष पाटील वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरखेडे ख. ता. चाळीसगाव जि. जळगाव ४) शोभाबाई भ. सुनिल पाटील, वय ३७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. निभोरा पोटली ता. भडगाव जि. जळगाव ५) सुनिता भ्र. सचिन पाटील, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेरी ता. पाचोरा जि. जळगाव ६) कल्पना भ्र. भुषण आमले वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडाळी वाघई ता. चाळीसगाव जि. जळगाव ७) प्रतिभा समाधान पाटील, वय ३१ वर्ष, धंदा घरकाम, रा. निंभोरे ता. भडगाव जि. जळगाव ८) सुंदराबाई भ. शिवाजी निकुंभ, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार

निरंक

अर्ज

Bombay Regulation Act 1827 चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बावत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील एस. एन. उपासणी यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ८ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ७ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे तसेच अर्जदार क्र. ८ ही अर्जदार क्र. १ ते ७ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ७ यांचे वडील व अर्जदार क्र. ८ यांचे पती नामे शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम हे होते ते दिनांक २१/१०/२०२५ रोजी मौजे सायगव्हाण ता. कन्नड अल्पशा आजाराने मयत झालेले आहे. तसेच मयत शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम यांचे आई व वडील हे पुर्वीच मयत झालेले आहे. मयताचा अंत्यविधी मोजे सायगव्हाण ता. कन्नड येथे झालेला आहे. त्यांचे अर्जदार क्र. १ ते ८ हे बारस आहे, सोबत गृप ग्रामपंचायत सायगव्हाण यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांना मयत शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय व इतर कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, करीता अर्जदार क्र. १ ते ८ हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे गृप ग्रामपंचायत कार्यालय सायगव्हाण येथे दिनांक १०/११/२०२५ रोजी बारस प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्र दिले नाही म्हणुन दिनांक १०/११/२०२५ रोजी अर्जास कारण घडले आहे, अर्जदार यांनी बारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ८ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ८ हे मयताचे कायदेशीर बारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,

दिनांक २६/०१/२०२६

**क. लिपिक** आदेशावरुन
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड**